डॉ. नितीन मोरे

# चक्रमादित्याचा दरबार ५



# चक्रमादित्याचा दरबार.. ५

## (द्विपात्री नाटक)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# चक्रमादित्याचा दरबार.. ५

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

**This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**

**हे नाटक पूर्णपणे काल्पनिक आहे. याचे कोणा वास्तवाशी साम्य आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा. करमणूक एवढाच याचा उद्देश आहे.**

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- १९ सप्टेंबर २०२३ (गणेशचतुर्थी)

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

या पुस्तकात व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. या पुस्तकातील कविता मे-जून २०२३ मधे लिहिलेल्या आहेत. त्यांचा आणि नंतर महाराष्ट्रात घडलेल्या घडामोडींचा काहीही संबंध नाही.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.


नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे सेहचाळीसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.


**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**


**Email -** drnmore@yahoo.com

चक्रमादित्य भाग १ ते ४

यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.






# प्रस्तावना

## चक्रमादित्याचा दरबार.. ५

महाराजांचा स्मार्टनेस आता देशाबाहेर म्हणजे विदेशांतही पोहोचला आहे. महाराज लोकल होते ते आता ग्लोबल झालेत. महाराजांनी विविध देश पाहिलेत. जगाच्या प्लॅटफॉर्मवर परफॉर्म करता करता महाराजांच्या विचारांचा फॉर्म बदललाय.

'एकच लक्ष्य.. जागतिक ओळख' असे घोकत महाराज आता राजेशाही सोडून लोकशाहीकडे पावले टाकायला लागले आहेत. लोकशाहीचे 'ग्लॅमर' त्यांना भुलवते आहे. जगभरातल्या लोकशाही देशप्रमुखांचा तोरा त्यांना भुलवतो आहे.. तेव्हा ती लोकशाही लोकशाही म्हणतात ती आपल्याला हवीच असा महाराजांचा आग्रह आहे!

पण ती लोकशाही म्हणजे तिच्यापाठोपाठ अजून सारी लोढणी आलीच.. तेव्हा तिच्या मागे जाता जाता 'राज्यहितास' सोडणे महाराजांना कसे पटावे? त्यातून महाराजांची काही 'बंदीवान' पावले पडतात..

पुढे काय?

चक्रमपुर कात टाकून लोकशाहीकडे वाटचाल करतेच.. त्यासाठीच भरतोय नव्या चक्रमादित्याचा नवा दरबार..

चक्रमादित्याचा दरबार.. ५

नेहमीप्रमाणे सारेच काल्पनिक..

आपल्या महाराजांच्या कल्पनेतील लोकशाहीच्या इतकेच काल्पनिक! तेव्हा योगायोगानेही काही साम्य वगैरे दिसण्याची शक्यता नाहीच. तरीही कुणी काही साम्य शोधण्याचा प्रयत्न केला तर तोच योगायोग समजावा!

डॉ.नितीन मोरे



ते



# चक्रमादित्याचा दरबार.. ५



*नांदी १*

महाराज : प्रधांजी..

प्रधानजी : जी महाराज..

महाराज : आम्ही दरबारात आलोच नाही तर चालेल का प्रधांजी?

प्रधानजी : जी नाही महाराज..

महाराज : आम्हाला नाही ऐकायची सवय नाही प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : मग आम्ही येत नाही प्रधांजी..

प्रधानजी : तसं करू नका महाराज..

महाराज : का प्रधांजी? आम्ही इतके इन्डिस्पेन्सेबल आहोत प्रधांजी?

प्रधानजी : होय महाराज! आणि तुम्ही नसाल तर नाटक कसे व्हावे महाराज?

महाराज : नाटक?

प्रधानजी : होय महाराज, आपण दोघेच आहोत नाटकात.. आपण नसलात तर एकपात्री प्रयोग होईल महाराज!

महाराज : असं म्हणता? मग आम्ही येऊ दरबारात प्रधांजी. एकपात्री व्हायचाच असेल तर ते पात्र आम्हीच असायला हवे! एक नाट्य एक पात्र! पण नव्हे! प्रधांजी.. तुम्ही कुठे जाऊ नका. हेच नाटकच व्हायलाच हवेच!

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आम्ही असूच. आपण ही अगत्याने येण्याचे करावे!

महाराज : हे काय विवाह सोहळ्याचे आमंत्रण आहे? सहकुटुंब सहपरिवार! नाटक पार पाडण्यास श्री समर्थ आहेत हे सांगावयास विसरलात! पण आम्ही दरबारात येऊच!

प्रधानजी : अवश्य महाराज!

महाराज : तर होऊन जाऊ दे नाटक..

प्रधानजी : जो हुकूम महाराज! आपल्याच दरबारात आपलेच स्वागत आहे महाराज!

# नांदी २



चक्रमादित्य महाराज थोर
एक तेच थोर बाकी सारे चोर

नमन करू तयास जोडून कर
महाराजांचा आशीर्वच हवा जर

नाही करावा राजांचा अनमान बरं
महाराजांविण राज्यक्रमण खडतर

लाभले राजे नशीब आपुले थोर थर

नमन वंदन साष्टांग प्रणिपात नमस्कार..

एक तेच थोर बाकी सारे चोर
चक्रमादित्य एकच महाराज थोर..

मांडिला थाट नाटकाचा जर
पहाया यावे सकलांनी सत्वर..
नच आलात तर..
कोप महाराजांचा भयंकर
चढेल सम नि विषम ज्वर
का पहा विषाची परीक्षा बरं..

एक तेच थोर बाकी सारे चोर
चक्रमादित्य एकच महाराज थोर..

१.

## नको परीक्षा.. नकोत प्रश्न!



महाराज आमूलाग्र बदललेले. सूट बूट. हातात आता फूल वगैरे काही नाही. आपल्या दरबारात येण्यासाठी महाराजांकडे आता खास चारचाकी गाडी आहे. त्या गाडीवर हेलिकॉप्टरसारखा पंखा आहे. महाराज हातात मोबाईल, कानात इयरफोन आणि ओठात येणारे इंग्रजी शब्द ते मधून मधून वापरतात. दरबाराची स्टाइलही आता थोडी देशी, थोडी विदेशी आहे.

महाराज दरबारात येताच सारे उठून उभे राहात :

गुड मॉरनिंग सर..

वेलकम टू द दरबार ऑफ द ग्रेट किंग चक्रमादित्य..

वेलकम टू द लँड ऑफ प्रोग्रेस अँड प्रा ्स्पॅरिटी, चक्रमपुर ..

महाराज चक्रमादित्यांचा विजय असो..

लाँग लिव्ह चक्रमादित्य..

हैल किंग चक्रम!

किंग चक्रमादित्या झिंदाबाद!

महाराज गाडीतून उतरून दरबारात येतात. वरच्या पंख्याच्या हवेने कुडकुडतात. इशाऱ्याने पंखा बंद करायचा इशारा करतात. मग येऊन सिंहासनावर बसतात.

महाराज : आम्ही कारभाराची पद्धत बदलली आहे प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज.

महाराज : होय? मग सांगा बदल काय केला आहे?

प्रधानजी : होय महाराज. म्हणजे कल्पना नाही असे नाही महाराज. म्हणून होय महाराज.. ऐकून आहे महाराज.

महाराज : मग तो बदल काय ते सांगावे प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज. पण आपणच स्वमुखे सांगितलेत तर प्रत्यक्ष श्रीकृष्णामुखी गीता श्रवण केल्याचे सौभाग्य प्राप्त होईल महाराज..

महाराज : आजपासून राज्याची हालहवाल पुसणे बंद!

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आम्ही पाहिले आहे.. आम्ही आहोत तर राज्याचा गाडा रूळावरच धावायचा. मग उगीच हालहवाल आम्ही विचारावी.. तुम्ही सांगावी. इट्स अ वेस्टेज ऑफ टाईम. वेळ हा अमूल्य आहे. तो वाया का घालवावा?

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : त्यापेक्षा त्याच वेळात मनुष्यहिताचे, निर्मनुष्य हिताचे, गावहिताचे, राज्यहिताचे, देशहिताचे, सृष्टीहिताचे, समष्टीहिताचे निर्णय घेण्यात हा मौल्यवान समय घालवावा..

प्रधानजी : होय महाराज! महाराज तुस्सी ग्रेट हो!

महाराज : तुम्ही हे व्हाॅटस्यापी शिक्षण ही घेतले आहेत? वा! अतिशय ज्ञानी आहेत प्रधांजी.

प्रधानजी : थ्यांक्स महाराज. असेच आमचे इकडून तिकडून ज्ञान तुषार गोळा करणे. ज्ञान संचय कुठून ही करावा. क्षणाक्षणाने नि कणाकणाने. आपली कृपा आहे महाराज.

महाराज : आमची कृपा? ती कशी प्रधांजी?

प्रधानजी : आपल्या यस्स विद्यापीठाने सगळीकडे होकारार्थी पहायला शिकवले. नकारार्थी काहीच न दिसल्याने आम्ही सकारात्मकच विचार करत असतो. त्यामुळे वेळ वाचतो. त्या समयाचा सदुपयोग आम्ही फेसबुक, इन्स्टा, व्हाॅट्सॅपी ज्ञानाच्या संचयासाठी करत असतो. ज्ञानाचा प्रचंड साठा आहे. घेता किती घेशील दो करांनी असे होऊन जाते महाराज..

महाराज : शाबास! तुम्ही नव्याने आलात. त्या शंभरापैकी नव्वद 'हो' म्हणणाऱ्या बॅचचे विद्यार्थी?

प्रधानजी : होय महाराज. प्रत्येक प्रश्नास होकारार्थी उत्तर! काँपिटिशन खूप होती पण आम्ही त्या बॅचचे टॉपर. म्हणून प्रधान झालो महाराज. सलग पंचवीस दिवस, पंचवीस तास, पंचवीस मिनिटे, पंचवीस सेकंद आम्ही हो, होय, हां, हां जी, यस, यस्सर असले फक्त होकारार्थी शब्द उच्चारून विक्रम केला महाराज. कुठलाही नकारार्थी शब्द नाही. खडतर परीक्षा उत्तीर्ण होऊन बनलोय प्रधान आम्ही.

महाराज : छान! आम्हाला आमच्या या सिस्टीमचा अभिमान आहे. काही वर्षांपूर्वी पिताश्रींनी ही 'यस्स' युनिव्हर्सिटी स्थापली त्याची फळे आता मिळावयास लागली. आमच्या दूरदृष्टीस आलेले फळ म्हणा! उगाच हाताखालील अधिकाऱ्याने वरिष्ठास नाही म्हणणे म्हणजे प्रगतीस खीळ बसवणे..

प्रधानजी : होय महाराज. वरचढ असतात म्हणून वरिष्ठ, वरिष्ठ होतात. हाताखालील कुणी त्यांना 'नाही' म्हणण्याचा प्रश्न येतोच कुठे?

महाराज : शाबास! आता आमच्या दूरदृष्टीने अशी शिक्षण देणारी विद्यापीठे जागोजाग उगवतील. त्यातून असे होकारार्थी काम उभे राहील..

प्रधानजी : होय महाराज! पण म्हणूनच की काय काही खलाशी व इतरही सैनिक वगैरे निषेध करत आहेत महाराज!

महाराज : दरबाराची सुरूवात अशा बातमीने?

प्रधानजी : क्षमा असावी. पण हो का? असा प्रतिप्रश्न विचारणारे सारे काही.. होकायंत्रे ही.. राज्य विघातक आहेत. म्हणूनच त्यांच्यावर बंदी आणली तर इकडे आपल्या राज्यातील तमाम खलाशी आणि खगोल शास्त्रज्ञ निषेध करताहेत.

महाराज : निषेध? त्यांची ही हिंमत? आम्ही घेतलेला निर्णय हा सर्वसृष्टी हिताचा असतो हे ठाऊक असूनही? आणि नसेल ठाऊक तरीही निषेधाची हिंमत आली कुठून? निषेध नि मोर्चे नि निदर्शने करायला इथे काही ती डेमॉक्रसी नाही! राज्य करणे हे राजाचे काम. तिथे लोकशाही नि लोकमताची थेरं काय कामाची? हो का यंत्राच्या उच्चारातच प्रतिप्रश्न आहे. आम्हाला फक्त उत्तरे आवडतात. प्रश्न नाही. आणि विचारलेले प्रश्न तर अजिबात नाही..

प्रधानजी : होय महाराज. शेजारील काही राज्यांत ही लोकशाही बोकाळल्याच्या बातम्या येत आहेत महाराज. तिकडे राजा निवडून येतो. लोक निवडतात..

महाराज : बस! बस! अधिक ऐकवत नाही.. हे भयंकर आहे. घातक आहे. लोकशाही! लोकांना काय कळते? त्यांचा संबंधच काय राज्य चालवण्याशी? लोकांनी आपापले कर भरावेत नि गुपचुप राहावे. लोकांना फुटलेला आवाज सर्वाधिक घातक.

प्रधानजी : होय महाराज. पण आपल्या राज्यास अशी भीती नाही महाराज.

महाराज : अजून नसेल ही. पण होऊ शकते. राज्यकर्त्यास अखंड सावधान रहावेच लागते. शत्रू कोठून हल्ला चढवेल सांगता येत नाही. शत्रू आतला असू शकतो वा बाहेरचा. सशस्त्र वा नि:शस्त्र. आणि शस्त्र नेहमीच दिसेल असे नाही. न दिसणारी शस्त्रे ही असतात..

प्रधानजी : होय महाराज.

महाराज : त्यापैकी न दिसणारे शस्त्र म्हणजे जनतेस पडलेले प्रश्न. शस्त्राहूनही घातक.

प्रधानजी : होय महाराज.

महाराज : आम्हाला वाटते की या बद्दल आम्ही मुलभूत विचार केला आहे. त्याची अंमलबजावणी करावी.

प्रधानजी : हुकूम महाराज.

महाराज : सखोल विचारांती आम्ही या निर्णयाप्रत आलो आहोत..

प्रधानजी : पिवळा पीतांबर महाराज..

महाराज : म्हणजे काय प्रधांजी?

प्रधानजी : द्विरुक्ती महाराज! आपला निर्णय आहे म्हणजे सखोल विचारांतीच असणार! ते वेगळे सांगायची गरज नसावी महाराज. सखोल नि सारासार, कठोर नि समयानुसार असणार आपला कुठलाही निर्णय हे सारा दरबार जाणतो महाराज. आपला निर्णय काय असावा हे ऐकावयास दरबारी जनांची कर्णेंद्रिये आतुरली आहेत महाराज.

महाराज : आम्ही विचार केला तेव्हा जाणवले, जनतेस प्रश्न पडतात कारण त्यांना तशी शिकवणूक दिली जाते. लहानपणापासून. शिक्षणाचा प्रकार असा की ज्यात नुसती प्रश्नोत्तरे. मग परीक्षा. त्यातही तेच. प्रश्न नि प्रश्न! आम्हाला प्रश्न पडतो, इतके सारे प्रश्न पडावेतच का? ज्यांची उत्तरे ठाऊक आहेत ती सोडून प्रश्नांमागे का धावावे? परत प्रश्नाचे उत्तर ज्यास ठाऊक तो हुशार गणला जातो. आम्ही म्हणतो समाज अस्वस्थ होण्यास हेच प्रश्न पडणे जबाबदार आहे.

प्रधानजी : होय महाराज.

महाराज : तेव्हा प्रश्न न पडणे हा यावर एकच उपाय. त्यासाठी लहानपणापासून उपाययोजना व्हावी. बालकांना प्रश्नोत्तरे, परीक्षा इत्यादींपासून दूर ठेवावे.

शिक्षण असावे पण प्रश्न नसावेत. असावीत फक्त उत्तरे. मुलांना प्रश्न म्हणजे काय हेच ठाऊक नसेल तर पुढे प्रश्न पडण्याचाच प्रश्न उद्भवणार नाही. लहानपणी फक्त उत्तरेच ठाऊक असतील तर पुढे राजाज्ञा हेच उत्तर हे अंगवळणी पडेल. समाजात अशी प्रश्न न पडणारी शांतता नांदू लागेल. असा समाज मग प्रगत होण्यास काय अवधी लागेल? आम्ही अशा समाजाचे नेते, तारणहार..

प्रधानजी : उद्धारकर्ते.. पालनकर्ते..

महाराज : सो.. गेट गोईंग! काढा हुकूम. नाहीतर वट हुकूम! आजपासून शाळाकॉलेजातून नि अभ्यासातून प्रश्न विचारणे बंद. परीक्षा कायमच्या बंद. आम्ही तर कदाचित वटहुकूम काढून प्रश्न ह्या शब्दावरच बंदी आणू पुढेमागे!

प्रधानजी : हुकूम महाराज. आजच शासन आदेश काढतो. स्पष्ट भाषेत! म्हणजे त्या आदेशाचा अर्थ नि अन्वयार्थ याबद्दल कोणास प्रश्न पडावयास नको!

महाराज : शाबास! त्वरीत होऊन जाऊ देत! आणि त्या होकायंत्राबद्दल काय खबरबात?

प्रधानजी : तो प्रश्न सुटला महाराज! त्या विशिष्ट शिष्टमंडळाशी बोलणी झाली महाराज. त्यांचे म्हणणे हे की हो का यंत्राचा हो का प्रश्नाशी संबंधच नाही!

महाराज : हो का? आम्हास शिकवताहेत? मुसक्या बांधा नि गठुडी वाळा..

प्रधानजी : ती नौबत नाही आली महाराज! यावर तोडगा निघाला. सन्माननीय!

महाराज : कसला तोडगा प्रधांजी?

प्रधानजी : आम्ही हो का यंत्राबद्दल बोललो तर शिष्टमंडळ म्हणाले, हो का यंत्रासच बाद करा

महाराज : मग कशाला निषेध?

प्रधानजी : आता नाहीच निषेध महाराज. त्यांनीच सुचवले हो का यंत्रावर बंदी आणा आणि तसेच एक दुसरे यंत्र आहे त्याला कंपास म्हणतात ते वापरण्याची परवानगी मिळावी!

महाराज : मग?

प्रधानजी : आम्ही दिली. कंपास वापरण्यास कसली आली हरकत! पण तो निषेधाचा मुद्दाच संपला!

महाराज : शाबास प्रधांजी. तुम्ही एक रत्न आहात!

प्रधानजी : थ्यांक्स महाराज.

महाराज : आज जरा दरबारी जास्तच रमलो आम्ही. तुम्हाला सांगतो, आम्ही दरबाराबाहेरच जास्त रमतो. कधी वाटतं सारं तुमच्यावर सोपवून फिरस्तीस जावे..

प्रधानजी : तसं कसं महाराज? आपल्यावाचून राज्य? आणि हे सिंहासन आम्हास नको..

महाराज : आम्ही सिंहासन सोडण्याबद्दल बोलत नाही प्रधांजी! फक्त हे दैनंदिन दरबारी काम.. पण नाही. आम्ही परत येऊच. दरबार भरवूच. तूर्तास आजचे कामकाज समाप्त. दरबार बरखास्त. आय विल टेक युवर लिव्ह..

प्रधानजी : जो हुकूम महाराज.

दरबारी : महाराज चक्रमादित्यांचा विजय असो..

लाँग लिव्ह चक्रमादित्य..

हैल किंग चक्रम!

किंग चक्रमादित्या झिंदाबाद!

२.

## जाहिराती.. बंद रातोराती!

महाराज आपल्या सुटाबुटात. आज एक मोठी गाडी आहे. त्या गाडीतून उतरताना पॅराशूट बांधून वरून उडी टाकतात. मग सिंहासनाकडे जातात.

महाराज दरबारात येताच सारे उठून उभे राहात :

गुड मॉरनिंग सर..

वेलकम टू द दरबार ऑफ द ग्रेट किंग चक्रमादित्य..

महाराज चक्रमादित्यांचा विजय असो..

एकच एक डॅशिग राजा..

वन अँड ओन्ली स्मॅशिंग किंग

चक्रमपुर हृदय सम्राट

किंग चक्रमादित्या झिंदाबाद!

लाँग लिव्ह चक्रमादित्य..

हैल किंग चक्रम!

महाराज : प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : नवीन प्रथेनुसार खबरबात विचारत नाही..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : तुम्हीही सांगू नका.

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : परीक्षा नि प्रश्नोत्तराबद्दलच्या आदेशाचे देशात किती स्वागत झाले प्रधांजी?

प्रधानजी : महाराज, आदेश निघाला, तत्काळ लागू केला गेला. त्यात सुधारणा करून पूर्वलक्षी प्रभावाने लागू झाला महाराज.

महाराज : अत्यंत हुशारीने घेतलेला निर्णय..

प्रधानजी : थ्यांक्स महाराज. त्या आदेशामुळे देशभरातील बालकांत एकच जल्लोष झाला. ही बालके जन्मभर आपली ऋणी राहतील महाराज. आदेश निघाला तेव्हा काही शाळांत परीक्षा सुरू होत्या. त्या तातडीने बंद पाडून प्रश्न व उत्तरपत्रिका जप्त करण्यात आल्या. विविध शाळांतून प्रश्नोत्तरांचा तास चालू असताना तिथे ही बेकायदा कृत्ये करणाऱ्या कित्येक शिक्षकांस अटक करण्यात आली आहे. पूर्वलक्षी प्रभावाने

गेल्या दोन महिन्यांत ज्या शाळांत परीक्षा झाल्या त्या शाळांतील मुख्याध्यापकांसही ताब्यात घेण्यात आले आहे. जुनी सर्व पुस्तके बेकायदा घोषित करून ती जमा करण्यासाठी केंद्रे उभारली आहेत. या महिना अखेरपर्यंत मुदत दिली असून बालक, पालक, शिक्षक, पुस्तक दुकानदार, जुनी पुस्तके विकणारे, रद्दीवाले आणि इतर कुणी ज्यांच्याकडे ही प्रश्नोत्तरधारी पुस्तके किंवा वह्या असतील त्यांनी रीतसर जमा करण्यास सांगितले आहे. केंद्राकेंद्रांवर त्यांच्या रांगा लागल्या आहेत. त्यानंतर कोणाकडे ह्यातील काहीही आढळल्यास त्यावर सामजिक दहशत प्रतिबंध कायद्याने कारवाई होईल अशा सक्त सूचना जारी केल्या आहेत.

महाराज : अति जलद गतीने अंमलबजावणी! आम्ही खुश आहोत! आमचा कारभार, अति जलद कारभार!

प्रधानजी : होय महाराज! मात्र नवीन पुस्तके लिहून छापून येण्यास थोडा विलंब होईल. तोवर शाळांना सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या आहेत. एखाद्या बालकाच्या आयुष्यात सहा महिने हा कालावधी काही जास्त नव्हे!

महाराज : अर्थात! आणि दूरच्या फायद्यासाठी आता काही वेळ असा देणे संयुक्तिकच आहे.

प्रधानजी : पण नेहमीप्रमाणे तज्ञ म्हणवणाऱ्या काही मंडळींनी लुडबुड केलीच महाराज. काही शिक्षणतज्ज्ञांनी या धोरणाबद्दल प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे म्हणणे आहे..

महाराज : बास प्रधांजी! लेट इट बी व्हाॅट एव्हर! त्यांचे म्हणणे ऐकण्याची गरजच काय? मुळात त्यांना बोलू देण्याचीच गरज काय? प्रश्न न विचारण्याच्या धोरणाबद्दलच प्रश्न! आणि हे तज्ञ? आणि मुळात आम्ही असताना इतर कोणी स्वत:स तज्ञ कसा म्हणवू शकतो? तज्ञांस शिक्षणातील कळत असेलही कदाचित पण आमच्या शिक्षण धोरणातले काय कळते? आमचा आदेश हा सर्वोच्च आदेश..

प्रधानजी : होय महाराज! आपल्या आदेशाची अंमलबजावणी तर होतेच आहे पण या शिक्षणतज्ञांना सामाजिक दहशत पसरवण्याच्या आरोपाखाली कैदेत ठेवण्यात आले आहे.

महाराज : अति योग्य! दहशतच ही. हातात बंदूक नसेल ही तरीही ही नैतिक, सामाजिक दहशतच. प्रश्न विचारणारे कुणीही असो, त्यांस दहशतवाद विरोधी कायदाच लागू व्हावा! या बद्दल कुठलाही प्रश्न उपस्थित होऊ नये.

प्रधानजी : होय महाराज. आपले आदेश सुस्पष्ट आहेत. आम्ही दहशतवाद विरोधी कायद्यात हे ही कलम घालू. राजाज्ञेविरोधी प्रश्न, दहशतवाद विरोधी कायद्याचा एक भाग होईल महाराज!

महाराज : शाबास प्रधांजी. यापुढे शाळाशाळांवर व्यवस्थित लक्ष ठेवा. कुणी बेकायदा प्रश्नोत्तरे वगैरे शिकवत नाहीत यावर बारकाईने पहारा ठेवा. नाहीतर ही शिक्षक जमात तशी नाठाळ आहे. पोरांना शिकवण्याच्या

नादात नियमभंग करतील. तो देशद्रोह होईल. त्यांच्यावर कडक कारवाई करा.

प्रधानजी : होय महाराज. या शिवाय शेजारील काही देशातून आलेल्या काही बातम्या आहेत महाराज. तिकडे एका दुर्गपूर देशात निवडणुकीची घोषणा झाली आहे. तर त्यापलिकडील तुर्कदेशात तिकडील राजाविरोधात असंतोषाच्या बातम्या आहेत. याशिवाय दूरदेशातून लोकशाही व्यवस्थेस जगात सर्वांनी स्वीकारावे म्हणून काही हालचाली होणार आहेत. आपल्या राज्यात मात्र तसे आलबेल आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीने घरे वाहून गेली आणि काही ठिकाणी अवर्षणाने लोक भुकेले असले तरी सरासरी पर्जन्यमान मात्र उत्तम आहे, त्यामुळे जनता सरासरी आनंदात आहे. राज्यात पाच ठिकाणी शाळेत चोरून जुनी पुस्तके घेऊन जाताना काही जणांस रंगे हात पकडण्यात आले आहे. त्यात काही लहान मुलांचा देखील समावेश आहे. परंतु आपले राज्यरक्षक पथक, कायदा अंमलबजावणी पथक, राजाज्ञा पालन पथक, दहशतवाद विरोधी पथक एकत्रित कामास लागल्याने हा कायदेभंग रोखण्यात यश आले आहे. तशा बातम्याही हाती आल्या आहेत.

महाराज : बास प्रधांजी. व्हा◌ॅट ॲम आय हियरिंग? या सर्व बातम्या? द न्यूज? देश विदेशातील वार्ता. इकडे असं झालं तर तिकडे तसं! आम्हाला कळत नाही या बातम्या आमच्या भोळया भाबड्या जनतेच्या कानावर पडतील

तर त्यांचे कसे होईल? इकडे आम्ही सारे सकारात्मक होण्यासाठी झटतोय. नि तिकडे हे असले? कोठून आल्या इतक्या बातम्या? त्यात कित्येक नकारात्मक?

प्रधानजी : अर्थात महाराजांनी व्यथित होऊ नये. परंतु महाराज, राज्यात कित्येक जागी वृत्तपत्र छपाईचे काम सुरू आहे. त्यात वृत्तपत्रकार म्हणवणारी मंडळी देशविदेशातून बातम्या गोळा करीत छापत असतात. त्यातीलच काही आम्ही महाराजांना कथन केल्या.

महाराज : वृत्तपत्रे? आमच्या राज्यात? मोठ्या प्रमाणावर?

प्रधानजी : आपल्या अंतर्गत सुरक्षा धोरणात वृत्तपत्रांचा उल्लेख अनवधानाने राहिला असावा महाराज. काही वर्षांपूर्वी राज्यात चक्रमपुर टाइम्स हे एकुलते एक वृत्तपत्र होते. त्यांचे चालक आपले निकटवर्ती श्री.रणसिंगराव होते. चक्रमपुर टाइम्स अजूनही फक्त सकारात्मक वृत्ते छापतो. परंतु त्यानंतर भूछत्रासारखी वृत्तपत्रे उगवली असून ती बातम्या छापून छापून त्यांची वृत्तपत्रे काढतात.

महाराज : बास प्रधांजी! वृत्तपत्रे वगैरे थेरं त्या डेमॉक्रसीवाल्यांसाठी. आपणासाठी ही वृत्तपत्रे म्हणजे प्रश्न निर्मिती केंद्रे. कोणाकोणावर लक्ष ठेवावे? कुणीही उठावे काही ही छापावे. आणि आमच्या जनतेने ते वाचावे? वाचावेच नव्हे तर त्यावर विश्वासही ठेवावा?

प्रधानजी : आपला हुकूम व्हावा. तर वृत्तपत्रांवर बंदी आणू महाराज. एका हुकुमाच्या अंतरावर आहे सारे..

महाराज : नव्हे प्रधांजी! तुम्ही सांगितल्यात त्यातील एक बातमी आम्ही ऐकली आहे. धोक्याची घंटा!

प्रधानजी : कोणती महाराज?

महाराज : अर्थात ती जगभरात लोकशाही व्यवस्थेचा प्रसार करण्याबद्दलची. जगातील वातावरणात बदल होत आहे. द वर्ल्ड इज चेंजिंग. त्यात वृत्तपत्रांवर बंदी घालण्यासारखे पाऊल उचलणे आत्मघातकी ठरेल प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : दरेक समस्येवर बंदी हा इलाज आम्हाला आवडतो पण तो तसा दरवेळी शक्य होईलच असे नाही. असे करावे की साप ही मरावा नि काठी ही तुटू नये!

प्रधानजी : आपण फक्त हुकूम द्यावा महाराज.. सर्व सापांस आत्महत्या करण्याचा आदेश काढू आम्ही.

महाराज : प्रधांजी, तुम्ही ते कराल ही! पण सध्या सर्पवर्गास बाहेर ठेवावे.

प्रधानजी : होय महाराज! जो हुकूम महाराज!

महाराज : आमच्या नजरेत यावर उपाय आहे.

प्रधानजी : अर्थात असणार महाराज. अशी कोणतीच समस्या नाही ज्यावर महाराजांकडे उपाय नाही! आपण हुकूम द्यावा.

महाराज : नाक दाबावे! म्हणजे तोंडे उघडतील!

प्रधानजी : होय महाराज. नाके दाबण्याचे आदेश काढतो महाराज.. कोणाकोणाची? किती दिवसांत सारी नाके बंद व्हावीत?

महाराज : बास प्रधांजी! कोणाची नाके दाबणार?नीट ऐकावे! आम्ही देतो आहोत तो आदेश वृत्तपत्राच्या जाहिरातींबद्दल आहे. उद्यापासून वृत्तपत्रातून जाहिरातींवर बंदी आणा! त्यांचे उत्पन्न बंद पडले की पुढे वृत्तपत्रे आपोआप बंद होतील.

प्रधानजी : होय महाराज! तुस्सी ग्रेट हो महाराज!

महाराज : लिहून घ्यावा आदेश..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : वृत्तपत्रे हा सुदृढ देशाचा पाया आहे. जनतेस सर्व बाबींची चारी अंगाने माहिती होणे जरूरी आहे. हे कार्य वृत्तपत्रे अत्यंत कार्यक्षमपणे निभावत आहेत. याबद्दल महाराज चक्रमादित्य वृत्तपत्रकारांबद्दल आभार व्यक्त करत आहेत. त्याचबरोबरीने वृत्तपत्रांना निर्भीडतेने व विना तडजोड आपले कार्य पुढे नेता यावे म्हणून वृत्तपत्रांनी यापुढे जाहिराती स्वीकारणे यावर पूर्वलक्षी प्रभावाने बंदी आणण्यात येत आहे. गेल्या दोन

महिन्यांपासून ही बंदी अमलात येईल. बंदी मोडणाऱ्यांवर तत्काळ कारवाईचे सर्व अधिकार सरकारी अधिकाऱ्यांस देण्यात आले आहेत.

प्रधानजी : ग्रेट महाराज!

महाराज : परंतु रणसिंगरावांचे वृत्तपत्र नेहमीप्रमाणे सुरू राहिल. मात्र त्यातील सरकारी जाहिराती बंद करा.

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आदेश पूर्ण ऐकावा प्रधांजी. चक्रमपुर टाइम्समधील सरकारी जाहिराती बंद करून तोच मजकूर बातम्यांच्या स्वरूपात छापून आणा! आपल्या बंदीहुकुमाचे पालन ही होईल. आणि रणसिंगरावांचे वृत्तपत्रही सुरू राहिल.

प्रधानजी : होय महाराज! पण त्यातील दोन महिन्याआधीच्या जाहिराती?

महाराज : काणाडोळा करा! इतके तर आपण आपल्या माणसासाठी करूच शकतो! आणि शेवटी वृत्तपत्र हा आपल्या राज्याचा महत्वाचा स्तंभ आहे.

प्रधानजी : होय महाराज! आणि चक्रमपुर टाइम्स मधील जाहिरातीहून बातम्यांचा परिणाम जास्त होईल महाराज! इथे साप ही मरणार नाही नि काठी आपटल्या सारखेही होईल महाराज! तुस्सी रियली ग्रेट हो महाराज!

महाराज : तुमचा व्हाटस्यापी अभ्यास जोरात सुरू दिसतोय प्रधांजी.

प्रधानजी : आपली कृपा आहे महाराज. तिथे जेवढे ज्ञानार्जन होते तेवढे इतरत्र कोठे होत नाही महाराज! धन्यवाद महाराज!

महाराज : ज्ञानाचे काय? ते कुठूनही मिळते. म्हणूनच शाळा सहा महिने बंद राहिल्या काय, काही बिघडणार नाही! तर आता दरबार बरखास्त करावा?

प्रधानजी : जो हुकूम महाराज!

महाराज : एक दरख्वास्त.. दरबार बरखास्त!

प्रधानजी : होय्य महाराज!

दरबारी :

लाँग लिव्ह चक्रमादित्या!
हू इज ग्रेटस्ट किंग?
चक्रमादित्या! चक्रमादित्या!
राजाधिराज चक्रमादित्य महाराजांचा विजय असो! विजय असो! विजय असो!
सफरीवरून आला सिंदाबाद..
झिंदाबाद! झिंदाबाद!
चक्रमादित्य झिंदाबाद!
चक्रमादित्य झिंदाबाद!

३.

# निदर्शनांनो गो बॅक.. !



महाराज सदरा आणि धोतरात. डोक्यावर टोपी. जाकिटावर चक्रमपुरचा झेंडा. गाडीतून उतरत हातातल्या मोबाईलवर बोलत सिंहासनाकडे येतात.

महाराज दरबारात येताच सारे उठून उभे राहात :

सुप्रभात महाराज.
चक्रवर्ती महाराज चक्रमादित्य यांच्या चक्रमपुर दरबारात चक्रमादित्य महाराजांचे स्वागत आहे.
चक्रमपुर सम्राट
चक्रमपुरीचा थाट
महाराजाधिराज सिंहासन विराज
दुष्टांचे कर्दनकाळ
सतर्क सदा सर्वकाळ
चक्रमादित्य महाराजांचा विजय असो!
विजय असो!

विजय असो!

महाराज : प्रधांजी, वृत्तपत्रविश्वाचे काय वृत्त? वर्तमानाचा भूतकाळ झालाच असावा आजवर?

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आणि त्यात 'तज्ञां'चे ऑब्जेक्शन वगैरे?

प्रधानजी : होय महाराज! तज्ञ मंडळी कुठे जाणार? बोलणे त्यांचे कामच आहे. त्याच्या जिवावरच ते जगतात. पण आपल्या हुकुमावर जास्त काही बोलू शकले नाहीत ते. आपला हुकूमनामाच तसा होता! त्यात म्हटल्याप्रमाणे वृत्तपत्रे हा सुदृढ देशाचा पाया आहे. तेव्हा आपण त्यांचे महत्व मानलेच नाही तर अधोरेखितही केले! त्यामुळे जास्त गडबड ते करू शकले नाहीत. जाहिरातीवरच वृत्तपत्रे चालतात हे सत्य ते कसे जाहीर करणार? एकेक वृत्तपत्र आता बंद होत आहे. महाराजांच्या कल्पनेस इतक्या जलदीने फळ येईल असे वाटले नव्हते.

महाराज : प्रधांजी, नेहमी आदर्शवादावर आधारित धोरणे बनवत राहणे महत्वाचे. आदर्शवादी धोरणांवर निषेध करणे, तो नोंदवणे हे समोरील विरोधकास कठीण जाते. एकदा वृत्तपत्रातील जाहिरात हा त्यांच्या स्वायत्ततेतील अडथळा हे सांगितले की पुढील काम सोपे! आपल्याला स्वायत्ततेची महती सांगताही येते आणि त्याबद्दल कोणीच आक्षेप घेऊ शकत नाही! जाहिराती बंद झाल्या की वृत्तपत्रांची रसद तोडली जाईलच..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आमचा विचार चाललाय.. अजून विचारच आहे, पण असे काही जमवून आणता आले तर आपले राज्य दुनियेसाठी लोकशाही राज्य म्हणूनही दाखवता येईल. शेवटी लोकशाहीस एक प्रतिष्ठा आहे. नीट अभ्यास केला तर जाणवेल की लोकशाहीच्या आडून राजेशाहीच काय हुकुमशाहीही चालवता येऊ शकते! पण त्या गोष्टीस वेळ आहे अजून.

प्रधानजी : आपणास काय अशक्य आहे महाराज. आपण मनात आणाल तर काहीही शक्य आहे. अशक्य शब्द आपल्या शब्दकोशात नाही!

*महाराज जोरात हसायला लागतात.*

प्रधानजी : क्षमा महाराज. पण काही चुकले का आमचे?

महाराज : नाही. राजपुत्र विचित्रसेनांची आठवण झाली. त्यादिवशी आम्ही त्यांना घोडेस्वारीबद्दल शिकवत होतो. त्यांना म्हटले एकावेळी दोन घोड्यांवर आरूढ होता येते आम्हाला. तर ते म्हणाले, इम्पॉसिबल! आम्ही म्हटले अशक्य शब्द आमच्या शब्दकोशात नाही! तर राजपुत्र म्हणाले, शक्य नाही पिताजी. तुमच्या डिक्शनरीत नसेल तर ती बदलून आणावी म्हणे! आम्ही इतके हसलो.. की डोळ्यात पाणी आले. आजही हसू येते आठवून!

*दरबारी व प्रधानजी एकसाथ मोठ्याने हसतात. कुणी एकमेकांना टाळ्या देतात.*

प्रधानजी : राजपुत्र विचित्रसेन अतिशय कुशाग्र बुद्धीचे आहेत. म्हणतात ना.. लाइक फादर लाइक सन!

महाराज : विचित्रसेन हुशार तर आहेतच, हजरजबाबीही आहेत. आता घोडेस्वारीचे धडे गिरवून झाले. आता फक्त प्रॅक्टिकल बाकी आहे!

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : त्यासाठी अश्वांची नेमणूक करावयाची आहे प्रधांजी.

प्रधानजी : होय महाराज. जो हुकूम महाराज. आजच जाहिरात देऊ महाराज वृत्तपत्रात.. अश्व पाहिजेत.. अबलख वारू.. झापडासकट .. सफेद रंग.. टापांचा आवाज अमुक तमुक.. शेपटाची लांबी.. अमुक.. शेपटातील केसांची संख्या.. तमुक..

महाराज : चुकताय तुम्ही प्रधांजी! क्रिकेटच्या भाषेत बोलायचे तर इट्स अ हिटविकेट! जाहिरातींबद्दलच्या आपल्या हुकुमनाम्याची शाई वाळली नसेल अजून आणि विसरलात प्रधांजी?

प्रधानजी : क्षमा महाराज. अभय असावे.

महाराज : अभय तर तुम्हाला आहेच. पण हा मजकूर बातमी स्वरूपात चक्रमपुर टाइम्समध्ये छापावा प्रधांजी!

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आम्ही योग्य ती कारवाई सुयोग्य पद्धतीने करतो महाराज, ज्यातून योग्य तो उमदा घोडा उमेदवार मिळावयास हवा.

महाराज : शाबास प्रधांजी. वृत्तपत्रे हळूहळू नाहीशी झाली की जनतेस आपोआप चक्रमपुर टाइम्समधील बातम्याच वाचावयास मिळतील. रणसिंगराव आमचे जानी दोस्त. त्यामुळे फक्त होकारार्थी नि सकारात्मक वृत्ते छापली जातील. आम्ही आधी विचार करत होतो, बातम्या बंदीचा. खरेतर राज्यात एका ठिकाणी काय होते हे समजून दुसऱ्या टोकाकडील जनतेचा काय फायदा? नुसत्या चांभारचौकशा नि गावगप्पांचा विषय. लोक मग नकारात्मक बातम्याच चघळत बसतात उगाच. हाऊ मेनी मॅन अवर्स आर वेस्टेड? इकडच्या काड्या तिकडे नि तिकडच्या इकडे! कशाला उचापती! पण हा आपोआप जालीम उपाय सापडला. आता सापही मेला नि काठीही शाबूत! परंतु एक खबरदारी घ्यावी प्रधांजी!

प्रधानजी : होय महाराज! हुकूम महाराज!

महाराज : चक्रमपुर टाइम्स नामक वृत्तपत्रात मधूनमधून राज्याबद्दल काही नकारात्मक बातम्या छापून आणाव्यात. अशा बातम्या ज्यांना फार महत्व नसेल. पण त्यामुळे ते वृत्तपत्र निर्भीड असल्याचे जनतेस वाटेल. दहा सकारात्मक बातम्यामध्ये एखादी अशी सडेतोड नि रोखठोक भाषेत बातमी टाकली की इतर बातम्यांची विश्वासार्हता वाढेल. आम्हाला 'सारेच एक चक्रमपुर एक राष्ट्र' वगैरे बोलावयास आवडते पण सर्वच

बातम्या एक साची असल्या तर जनता त्यांवर सरकारी वृत्तपत्राचा शिक्का मारेल. तसे होऊ नये. मधूनमधून खास नकारार्थी व सरकारावर प्रश्नार्थी बातम्या पेरत रहा. वृत्तपत्राची विश्वासार्हता टिकवण्याचा हाच एक सुरक्षित मार्ग आहे!

प्रधानजी : होय महाराज! तुम्ही खरंच ग्रेट आहात महाराज!

महाराज : खरंच ग्रेट? म्हणजे आजवर तोंडदेखले ग्रेट म्हणत होतात प्रधांजी?

प्रधानजी : (अडखळत) तसं नव्हे महाराज.. पण..

महाराज : असू द्या.. प्रधांजी गंमत नुसती. हे एक बातम्यांचे त्रांगडं सुटलं नि आम्हाला खूप बरं वाटतंय आता.

प्रधानजी : खरंय महाराज! पण आम्ही जनतेपर्यंत आपल्या कार्यबाहुल्याची माहिती पोहोचवली आहे.

महाराज : बाहुल्या? प्रधांजी, इथे बाहुल्या कोठून आल्या?

प्रधानजी : कार्यबाहुल्य हा नवीन शब्द आपल्या वर्डस आणि फ्रेजेस डिपार्टमेंटने चलनात आणला आहे महाराज. महाराजांना शब्दांचे प्रेम आहे हे त्यांना ठाऊक आहे. म्हणून नवनवीन शब्द प्रचलित करण्याचे प्रयत्न आहेत महाराज. बाहुला नि बाहुलीशी यांचा संबंध नसून कार्यबाहुल्य म्हणजे अतिव्यस्तता..

महाराज : व्यस्तता? ती ही अति? म्हणजे काय?

प्रधानजी : म्हणजे बिझी पणा!

महाराज : बिझिनेस म्हणा की प्रधांजी!

प्रधानजी : होय महाराज! बिझिनेस म्हणजे महाराज दिवसरात्र एक करत रात्रंदिवस काम करतात हे जनतेस समजले आहे. त्याबद्दल कौतुकादराची लाट ही उसळताना आम्ही पाहिली आहे. जनतेसाठी चक्रमादित्य महाराज हेच देव! तेव्हा भक्तिभावाने जनतेस आपल्या फोटोंस नमस्कार करताना आम्ही पाहिले आहे. बहुलपुर गावात तर चक्रमादित्य मंदिर बांधण्यात आले असून तिथे दिनरात्र भक्त मंडळींची रीघ लागली असते.

महाराज : जनतेचे प्रेम हीच आमची शक्ती! आणि म्हणूनच आम्ही आज या देशाचा वेश परिधान केला आहे. सदरा आणि धोतर. जसा देश तसा वेश! जसा वेश तसा देश! राज्याच्या प्रजेस आपल्या संस्कृतीचा व वारशाचा अभिमान वाटावयास हवा! म्हणून हा परंपरागत वेश.

प्रधानजी : होय महाराज! एत्तदेशीयांस देशाभिमान हवाच!

महाराज : आपण आज नवनवीन शब्दांचा वापर करत आहात..

प्रधानजी : नव्हे महाराज. एत्तदेशीय हा जुनाच एत्तदेशीय शब्द! फक्त शब्दाची काठिण्यपातळी थोडी अधिक आहे! आणि शब्द थोडा कठीण असल्यास तो वापरणाऱ्याची विद्वत्ता पातळी वाढते असे निरीक्षण आहे महाराज!

महाराज : छान! आपल्या दरबारी कामकाजाची गांभीर्य पातळी वाढवण्यास असे शब्द वापरत चला..

प्रधानजी : यावच्चंद्रदिवाकरौ अशा व्यवच्छेदक शब्दांची रचना एकसमवच्छेदे करून आम्ही दरबाराचे कामकाज गांभिर्यपूर्वक चालवणे सुरू ठेवू महाराज!

महाराज : हुकुमनाम्यातही असे शब्द वापरत चला! जेवढा शब्द कठीण, तेवढा अर्थ संदिग्ध, तेवढाच हुकुमाचा रूबाब नि:संदिग्ध!

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : असो. परंतु आजचे कामकाज तर अजून बाकीच आहे..

प्रधानजी : होय महाराज! आपण हुकुमावे महाराज! समस्त दरबारी आपले आदेश व हुकूम झेलण्यास सदा तत्पर व तयार आहेत महाराज.

महाराज : प्रधांजी, आज कोणावर बंदीहुकूम आणला नाही आपण! आपली एफिशियन्सी पातळी तर खालावत नाही ना? दरबाराचा वचक कायम रहायचा असेल तर दर दरबारी एकतरी बंदीहुकूम निघालाच पाहिजे प्रधांजी! आमची घोषणाच आहे ती, 'एक दरबार एक बंदी हुकूम'

प्रधानजी : होय महाराज!

*एक शिपाई धावत आत येत एक कागदाची गुंडाळी प्रधानजींच्या हाती देतो. प्रधानजी ती वाचू लागतात. वाचता वाचता चेहऱ्यावरचे भाव बदलत गंभीर ते अति गंभीर ते चिंताग्रस्त असे होत जातात.*

महाराज : काय झाले प्रधांजी? आपला हा तूप खाऊन रूप आल्यासारखा लखलखीत चेहरा असा का तव्यावरच्या न परतलेल्या भाकरीसारखा करपून रखरखीत दिसायला लागला?

प्रधानजी : मामला गंभीर आहे महाराज. 'समस्तीपुर बांधव एकता समिती'ने त्यांच्या गावातील तलाव बुजवून तिथे रस्ता बांधण्यास विरोध करत निदर्शने केली आहेत. तिकडील तलावाकाठी लोक बसून निषेध करत आहेत. खरेतर तलावात गाळ साचून तो आपोआप बुजण्यास जास्त काळ जाऊ नये. तरीही स्थानिक प्रशासन आपल्या खर्चाने तो बुजवून रस्ता बनवू पाहात आहे. तेथील जनतेची मात्र गाळ काढून तलाव परत पाण्याने भरावा अशी मागणी आहे. पाण्यात घालवायला राज्य दरबारी पैसा जणू पाण्यासारखा उतू चालला आहे!

महाराज : धिस इज अ सीरियस इश्शू प्रधांजी. मोर्चा, निषेध, निदर्शने आणि आंदोलने! असं वाटतं काही लोकांना आंदोलनाशिवाय चैन पडत नाही. आंदोलनजीवी असणार सगळे.

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : प्रधांजी, आम्हास सांगा या सगळ्यावर तुमच्या मते उपाय काय?

प्रधानजी : अर्थात बंदी! मोर्चा, आंदोलने, निदर्शने यावर संपूर्ण बंदी. लोकांनी आपला अमूल्य वेळ उत्पादक गोष्टींत घालवावा! असल्या अनुत्पादक बाबींत वेळ वाया घालवून ते चक्रमपुरास मागे नेत आहेत..

महाराज : चुकताय तुम्ही प्रधांजी! आम्ही मागच्या वेळी म्हणालेलो, बंदी घालायला आम्हाला आवडते. 'एक देश, एक दरबार, एक बंदी' पण करावयास हरकत नाही! पण सब घोडे बारा टक्के असला इलाज इथे चालत नाही! सापाला मारा, बंदूक दुसऱ्याच्या खांद्यावर ठेवून. सापाला मारा, पण लाठीकाठी न तोडता! तेव्हा उपाय सोपा आहे! या सर्व आंदोलकांना निदर्शनांसाठी एखादी वैराण जागा शोधून द्या. ती त्यांच्यासाठी आरक्षित करून ठेवा. हवे तितके दिवस तिथे आंदोलन करू द्यात. तिकडे ऊन, पाऊस, थंडी यातून बचावाची कोणतीही साधने उपलब्ध होणार नाहीत हे पहा. त्याचबरोबर आंदोलने करणे हा जनतेचा हक्कच असल्याची निवेदने ही प्रसृत करा. आंदोलनांकडे प्रथम पूर्णपणे दुर्लक्ष करा. मग कनिष्ठतम कारकुनास त्यांच्याशी वाटाघाटी करावयास पाठवून थोडे झुलवत ठेवा. आंदोलनातील मुद्दयावर बोलताना पडते घ्या. प्रत्यक्षात कृती उलटी करत रहा. तारीख पे तारीख पाडत त्यांच्या संयमाची परीक्षा पहा. कुठे त्यांना थोडीफार हिंसा करण्यास उद्युक्त करता आले तर अति उत्तम. कारण त्यानंतर त्यांना पडते घ्यावेच लागेल.

याचवेळी चक्रमपुर टाइम्समधून आंदोलनाबद्दल बातम्या पसरवा. दहा त्यांच्या विरोधात तर एक आंदोलनाच्या बाजूने अशा बातम्या पेरत रहा. त्यांच्या बाजूने मध्येच काही लिहिले तर इतर बातम्या अनबायस्ड वाटतील. आंदोलनातील पुढाऱ्यांच्या नैतिक, सामाजिक, आर्थिक बाबींबद्दल खऱ्याखोट्या बातम्या सतत छापून आणा. थोडक्यात होऊ द्यात चारी बाजूने कोंडी. लोकांचा संयम तसा कमी असतो. त्याची परीक्षा पहा. इतर लोकांची सहानुभूती संपेल. ते संशयाने पाहू लागतील. हळूहळू सगळेच मूळ मुद्दा विसरतील. पब्लिक मेमरी इज ऑलवेज शॉर्ट. नाहीच विसरले तर पुढे पाहू.. तोवर नवीन मुद्दा येईलच. किंवा आपण उपलब्ध करून देऊ!

प्रधानजी : होय महाराज! पण इतकी सारी यातायात?

महाराज : प्रधांजी, दुनिया दुर्बिणीतून आपल्या देशाकडे पाहते आहे. लोकांचा आवाज थेट दडपणे सोपे. पण त्यास हुकुमशाहीचा वास येतो. जनभावनांची कदर केल्याचे दाखवत ते दडपणे यास खरे राज्य चालवणे म्हणतात! घोषित बंदी ऐवजी अघोषित बंदी जास्त परिणामकारक होऊ शकते. फक्त तसे करण्यासाठी त्यामागचा विचार पक्का हवा! आणि कृती तर अजूनच जास्त विचार करून करावयास हवी!

प्रधानजी : होय महाराज! आपण ग्रेट आहात महाराज!

महाराज : ही गादी, हे सिंहासन, हा मुकुट सारेच काटेरी आहेत प्रधांजी. जनतेसाठी तीळ तीळ तुटतानाच जनतेविरोधात ही जावे लागते. राज्य मजबूत करायचे तर राजाच्या नजरेने पहावे लागते. सिंहासन सांभाळायचे नि आपला आब राखायचा तर राजाज्ञा पालनासाठी कठोर व्हावे लागते. ते करताना जनतेतील कोणा न कोणावर अन्याय होणारच. तो होत असतानाच त्याच जनतेस तो पटवून ते सारे अंतिमत: त्यांच्याच हिताचे हे सांगत बसावे लागते! कधी या सत्तेचा वीट येतो. या सत्तेत जीव रमत नाही! सारे सोडून जंगलात निघून जावेसे वाटते..

प्रधानजी : नाही महाराज! माफी असावी पण इथे आम्ही होय महाराज नाही म्हणू शकणार! पण लाखोंच्या पोशिंद्याने असे बोलू नये. राज्याच्या कानाकोपऱ्यातून भक्तिभावे नमन व वंदन करणारी प्रजा असताना महाराजांनी असे बोलू नये. प्रत्यक्ष राजा रामचंद्र अन श्रीकृष्ण तरी या संकटांतून सुटले नसतील तर चक्रमपुरीच्या देवास ही या दिव्यातून जावे लागत असावे यात आश्चर्य नाही महाराज. आम्हाला वाटते महाराज आपण शिणला आहात. आज विश्रांती घेतलीत तर परत पुढील दरबारात नव्याने राष्ट्रहितासाठी कशावर तरी बंदी आणण्याचे काम करता येईल.

महाराज : असं म्हणता प्रधांजी? तर मग करूया दरबार बरखास्त. परत येतो आम्ही नव्या जोमाने. हे काटेरी सिंहासन आम्हाला परत ओढून आणेलच.. तोवर गुड बाय. लवकरच भेटूच!

प्रधानजी : होय महाराज!

दरबारी :

लाँग लिव्ह चक्रमादित्या!
जास्त जगा चक्रमादित्या
जगात सर्वात मोठा कोण?
राजा चक्रमादित्या आणि कोण?
राजाधिराज चक्रमादित्य महाराजांचा विजय असो!
विजय असो!
विजय असो!
एकच महाराज, बाकी सारे बाद
झिंदाबाद! झिंदाबाद!
चक्रमादित्य झिंदाबाद!
चक्रमादित्य झिंदाबाद!

४.

## एक नॉट टवाळ राज्य.. अर्थात चक्रमपुरात विनोद बंदी!

महाराज परत सुटाबुटात. टायवर राजमुकुटाची डिझाईन. हाती मोबाईल. कानात इयरफोन. भाषण ठोकल्याचे हातवारे करत आत शिरतात.

दरबारी :

लाँग लिव्ह द चक्रमपुर किंग महाराजाओंके महाराजा चक्रमादित्या!
आकाशास्थ एकच आदित्य
पृथ्वीवरती चक्रमादित्य! चक्रमादित्य!
एकही महाराजा बाकी सारे बाद!
चक्रमराजा झिंदाबाद! झिंदाबाद!
राजाधिराज चक्रमादित्य महाराजाचा विजय असो.
जय असो! विजय असो!

महाराज : वा! प्रधांजी, आम्ही आमचेच रेकॉर्डेड भाषण ऐकत होतो. वा! त्या आफ्रिकन देशातील बेटावर आम्ही सडेतोड भाषण केले. त्यांना न आपली भाषा कळते न इंग्रजी, न आपल्याला त्यांची! दुभाषा पण नाही.

पण भाषा हा अडसरच नाही! त्यांची ती पारंपरिक टोपी चढवली नि वल्कले आमच्या तुमानीवर चढवली. मग आमचे भाषण झाले. तिकडे आमच्या रसवंतीस बहार येते! आम्ही बोलतो ते या मनातील गोष्टी त्या मनात घालावयास! त्यामुळे त्यांनी आपल्या मनाने टाळ्या पिटल्या! तिकडून निघताना खास आफ्रिकन मुंग्यांचे लोणचे नि आफ्रिकन झुरळांचा मुरांबा बांधून दिलाय! एक भाला आणि एक वल्कलं पण दिलेय सप्रेम भेट म्हणून!

प्रधानजी : आम्ही ऐकले आपले भाषण यू ट्यूबवर महाराज. असे वाटते की त्या वाळवंटातील निवडुंगाना पालवी फुटेल नि त्या रेताड प्रदेशात फुले उमलतील. आपले भाषण ऐकून आम्हीच नाही तर समस्त चक्रमपुरवासी अत्यंत भारावलो आहोत. टिंबक्टिंब बेटावर चक्रमपुरचा झेंडा डौलाने फडकताना पाहून आमचा ऊर भरून आला महाराज. सारे काही प्रत्यक्ष ईश्वरावतारी महाराजांमुळेच!

महाराज : आम्हाला असे बाहेरील देशात जाणवते, इथे आम्हाला नाहक प्रश्न विचारले जातात. बाहेरील देशात आम्हाला इतके प्रेम व सन्मान मिळतो. असे वाटते आम्ही दूरदेशीचे दौरेच करत रहावेत. पण नाही! इथे बंदीची कामे अडकतील. हे काटेकुटेरी सिंहासन व हा दुस्तर राज्यपथ.. या बंदी हुकुमांचे बंदी आम्ही जणू! कर्तव्यपालन म्हणून तरी आम्हाला यावेच लागेल इथे. आमच्या कर्तव्यपालनापासून आम्ही कसे दूर राहू?

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : प्रधांजी, त्या निदर्शकांचे काय झाले?

प्रधानजी : आपल्या आज्ञेनुसार महाराज. त्यांच्यातील मुख्य तीन जणांवर थेट देशद्रोहाचे आरोप झाले. तेथील जनता चिडली. त्यांच्यातील दोघांचे एकेक पाय व एकाचे दोन्ही हात लोकांनीच मोडले. सध्या त्यांचा इलाज सुरू आहे. चक्रमपुर टाइम्स मध्ये या बद्दल सविस्तर वृत्त छापून आणले आहे महाराज. त्या गडबडीत रातोरात तेथील तलाव बुजवून रस्ता बनवला गेला आहे. हा रस्ता 'रणसिंग आणि रणसिंग कंपनी'स भाडेतत्वावर हस्तांतरित ही झाला आहे. आपले जलदातिजलद प्रगती व विकासाचे मॉडेल म्हणून हा रणसिंगरावांचे पिताश्री श्री. विजयसिंग यांच्या नावाचा 'कै.विजयसिंग पथ' यापुढे आपल्याला दाखवता येईल.

महाराज : प्रधांजी, तुम्ही अत्यंत शिताफीने सारे मॅनेज केलेत. आम्हाला अभिमान आहे. त्या तिघांचे थोडे हाल होतील, पण जनतेच्याच भल्यासाठी हे आवश्यक आहे! देशाच्या हितासाठी त्या तिघांना देशद्रोही ठरवणे जाणे गरजेचे होतेच. आणि रस्ता तर जनतेसाठीच बनवला गेला आहे. आता कारण नसताना बळाचा वापर आम्हाला आवडत नाही. पण चूक त्या निषेधकर्त्यांचीच आहे. न आम्ही असल्या आंदोलनजीवींस महत्व देतो न निदर्शनांस. हे ठाऊक असूनही यांना निषेध करण्याची खुमखुमी मोठी. याची किंमत मोजावीच लागणार

त्यांना. आमचा नाइलाज आहे. आमचे पिताजी म्हणत, दहा लोकांस न्याय द्यायचा तर एकावर अन्याय करणे न्याय्यच आहे. आणि निदर्शने, आंदोलने वगैरे दडपणे अंतिमत: राज्य हिताचेच असते. त्यामुळे देश स्थिर राहतो. आणि राजेच्छा ही प्रत्यक्ष भगवंताची इच्छा. तेव्हा त्या आज्ञेचे उल्लंघन हा मोठाच धर्मद्रोह. कधी या सगळयांस उमजेल नि कधी नसती आंदोलने बंद होऊन आम्ही राज्यास प्रगतीपथावर सुसाट नेऊ..

प्रधानजी : काळजी नसावी महाराज. असले शंकासुर संख्येने कमीच उरले आहेत. काही रूग्णालयांत आहेत तर काही कारागृहांत. काहींना जनतेनेच न्याय करत प्रत्यक्ष भगवंताघरी खऱ्याखोट्याचा हिशेब करावयास पाठवले आहे. चक्रमपुर टाइम्स जनतेच्या मनावर प्रगतीशील चक्रमपुराची प्रतिमा बनवण्यास कटिबद्ध आहे. त्या बदल्यात त्यास एखादा रस्ता खाजगी उत्पन्नासाठी देणे ही फार मोठी किंमत नाही!

महाराज : योग्य आहे प्रधांजी. आम्हांला तुमचा अभिमान आहे!

प्रधानजी : थ्यांक्स महाराज. आपली कृपा आहे!

महाराज : मग आजचे कामकाज काय प्रधांजी? लागोपाठच्या परदेश दौऱ्याने थकायला झाले आहे. देशविदेश पाहिले की सारे जहां से अच्छा चक्रमपुर हमारा म्हणावेसे वाटते. अर्थात जसा राजा तसा देश! आम्ही त्या आफ्रिकेत लहानपणीही होतो. पिताश्रींनी तिकडे शिकायला

पाठवले. तिकडे झुलू डान्स शिकलो आम्ही आणि भाला घेऊन उड्या मारायला. जंगलात शिकारी करायचो तेव्हापासून आफ्रिकेशी आमची दोस्ती.. तिकडच्या कृष्णवर्णीयांत आम्ही रमलो..

*अचानक तीन जणांना शिपाई समोर पकडून आणतात. तिघांचे हात बांधलेले. तोंडावर लाल रंगाची पट्टी X च्या आकारात चिटकवलेली. प्रधानजी आणि शिपाई एकमेकांशी काही बोलतात. प्रधानजींचा चेहरा गंभीर ते अति गंभीर ते चिंताग्रस्त होत जातो..*

प्रधानजी : अति गंभीर मामला आहे महाराज. अति गंभीर.

महाराज : काय झाले प्रधानजी? (एकाएकी नाटकीपणे) मुंग्यांनी मेरूपर्वत तर नाही गिळला? सुईच्या छिद्रातून हत्ती तर नाही गेला? जिराफ खुद्द नारळाच्या झाडावर तर नाही चढला? झेब्र्याच्या पट्ट्यांचा रंग तर नाही गेला?

प्रधानजी : नाही महाराज.. हे तिघे.. यातील एकाने त्या निदर्शकांतील त्या तीन जणांबद्दल व्यंगचित्र काढले, एकाने एका ठिकाणी उपरोधिक विनोदी लिखाण केले तर एकाने अति हास्यस्फोटक विनोदी भाषण ठोकले. राज्यातील विविध घटनांबद्दल आपापली मते व्यक्त करतात हे लोक.

चक्रमपुर टाइम्स मध्ये कधी न आलेल्या, म्हणजेच न घडलेल्या गोष्टींबद्दल उपरोध नि विनोद..

महाराज : व्यंगचित्र? विनोदी लिखाण नि भाषणे? काय चाललंय तरी काय या चक्रमपुरी? इकडे आम्ही क्षण न क्षण प्रगतीसाठी झटतोय. कण न कण वेचून मणभरून विकास साधू पाहतोय. आम्हाला जनतेचे दु:ख, दैन्य, गरीबी दिसत असते सतत. अति गंभीर बाबी साऱ्या. त्यात यांस हसणे सुचावे? हसणे? इतक्या साऱ्या समस्यांच्या जंजाळात कोणी कसे काय हसू शकतो? देशद्रोह नव्हे तर काय म्हणावे यास?

प्रधानजी : यातील एकास तर हास्यचित्र काढताना रंगे हात पकडलेय महाराज. वर या साऱ्यांस याबद्दल न खेद न खंत.

महाराज : अतिशय दु:खदायक. आपल्याच राज्यातील समस्यांबद्दल हसणे? लोकांना हसवणे? समोर इतके सारे गहन प्रश्न पडले असताना? त्यात मग तुम्ही हसूच कसे शकता? लोकांना हसवू कसे शकता? राजाज्ञेचा उपहास हा देवाचा उपमर्द. त्यामुळे उपहास हा विनोदाचा मोठा भाऊ असेल तर त्याचा गुन्हा अति गंभीर आणि अतिदखलपात्र आहे. आमचे शिपाई दयाळू आहेत म्हणून फक्त हात बांधले नि तोंडे बंद केली. यापुढे असल्या लोकांची असली मनमानी चालायची नाही.

प्रधानजी : होय महाराज! आपले सैनिकदल सतर्क आहे म्हणून या समाजविघातक बाबींची तातडीने दखल घेतली गेली महाराज. आपल्या

'सामाजिक दहशतविरोधी दल' व 'सामाजिक शांतता दल' यांनी या संबंधात धडाडी दाखवत यांना रंगे हात पकडले. यातील एकाने तर हातात पेंटिंगचा रंगात बुडवलेला ब्रश हाती घेतला असताना त्याच्या मुसक्या आवळल्या गेल्यात. तर हा बोरूबहाद्दर लेखक दाढी करण्याचा ब्रश हाती असताना पकडला गेलाय. आम्ही तर म्हणतो महाराज ही राज्यविघातक, देशविरोधी व देशद्रोही तीन माकडे आहेत.

महाराज : अत्यंत योग्य प्रधांजी. तीन माकडे. लवकरात लवकर यांना आमच्या नजरेआड करा. देशविघातक कट व सशस्त्र उठावाची तयारी या आरोपांखाली खटला चालवा. कुणी म्हणेल शस्त्र कुठे? तर यांचे ब्रश, पेन, वाणी हेच शस्त्र. इतर शस्त्रांहून अधिक घातक व अधिक विघातक अशी अस्त्रे आहेत ही, जी वाचणाऱ्याच्या, ऐकणाऱ्याच्या मेंदूवर परिणाम करू शकतात. शब्दांची इजा शस्त्राहून जास्त असते. एकावेळी अनेकांस जखमा करू शकतात ते शब्द नि ती व्यंगचित्रे. आता यांना अंधारकोठडीत टाका. आपले कायदाखाते जर यांच्यावरील आरोपांबद्दल खात्रीने काही सांगू शकत नसेल तर विना आरोप कैदेत राहू द्यात. दहशतविरोधी कायद्यासाठी आरोपांची गरज नसावी. घेऊन जा यांना..

*शिपाई तिघांना घेऊन जातात.*

महाराज : आम्ही अति व्यथित आहोत. आम्ही इथे दिवसरात्र एक करत आहोत नि हे राज्यभर दहशत नि अशांतता पसरवत फिरत आहेत. ते ही दिवसाढवळ्या? विनोदाबद्दल आमचा आकस नाही. विनोद करा, हसा, हसवा. पण कधी? सर्व समस्या निवारण झाले की. राज्यातील लहानात लहान अशा घटकातील शेवटच्या व्यक्तीच्या तोंडावर हसू आले की खुशाल करा विनोद! खुशाल हसवा लोकांना! आम्ही अति संवेदनशील आहोत! हे असले असंवेदनशील नि अघोरी प्रकार बंद व्हायलाच हवेत! प्रधांजी..

प्रधानजी : हुकूम महाराज..

महाराज : आजपासून ताबडतोब राज्यभरातील विनोदावर बंदी आणा. सामाजिक शांतता व दहशतविरोध या कायद्यांखाली कुणीही विनोद सांगणे, ऐकणे किंवा तसा प्रयत्न करणे हा गंभीर गुन्हा मानला जाऊन तो देशविघातक कारवायांखाली येईल. हा नियम सर्कशीतील विदूषकांसकट सर्वांस लागू! हे धोरण आजपासून लागू होईल.

प्रधानजी : पूर्वलक्षी महाराज? आमच्या माहितीत असे काही विनोदवीर आहेत..

महाराज : वीर? सर्वांना दहशतवादी ठरवून कोठडीत टाका. एकेकाचा गुन्हा कुठल्या न कुठल्या कायद्या अंतर्गत येण्यासाठी त्याप्रमाणे कायदे

बदला.. पूर्वलक्षी प्रभावाने! समजू देत या राज्यात कायदा किती प्रभावीपणे राबवला जातो ते! चक्रमपुर इज अँड विल्बी नोन द वर्ल्ड ओव्हर फॉर लॉ एन्फोर्समेंट!

प्रधानजी : होय महाराज. आम्ही आजच हुकूम काढतो. धरपकड करवतो.. फक्त एक अडचण आहे..

महाराज : कायदे राबवण्यात अडचण?

प्रधानजी : महाराज, देशभरातून कित्येकांस कैदेत ठेवण्यात आले आहे. कित्येकांस तर आपणास सोडावयाचे नाही. काहींवर तर आरोपपत्रही दाखल नाही. अशा परिस्थितीत तुरूंगाची जागा कमी पडते आहे महाराज!

महाराज : या उदात्त व पवित्र कार्यासाठी तत्काळ निधी मंजूर होईल तोवर काही राहत्या इमारती खाली करा. तेथील निष्पाप नागरिकांची व्यवस्था तंबूत करा. त्यांना ही या देशकार्यात सामील होण्याची संधी लाभेल. पण या देशद्रोह्यांपैकी एकास ही सोडू नका..

प्रधानजी : हुकूम महाराज!

महाराज : आम्ही आता खरेच शिणलो आहोत. बाहेरील देशांत आमच्याबद्दल आदर दिसतो. तिथे हे सारे प्रश्न कोणी उपस्थित करत नाही. इथे आलो की मूड खराब करतात हे.. विनोदी लोक! विनोदच म्हणावा हा! पण

राजास सारेच सहन करावे लागते.. ते आम्ही करत राहणार! नि राज्याच्या विकासाचा रथ प्रगतीपथावर दौडवत ठेवणार!

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : दरबार बरखास्त.. आम्ही आता आत्मचिंतनात काल व्यतीत करू इच्छितो..

प्रधानजी : हुकूम महाराज!

दरबारी :

लाँग लिव्ह चक्रमादित्य..
कल, कल, और आज
धीरगंभीर, गंभीर महाराज!
महाराज चक्रमादित्य झिंदाबाद!
विदूषकांना येईल नानी याद
चक्रमादित्य झिंदाबाद! झिंदाबाद!
महाराज चक्रमादित्यांचा विजय असो..

५.

# शिक्षणाच्या आयचा.. घो!



महाराज आज सदरा धोतरात आहेत. गाडीतून उतरतात. आज हातात गुलाबाचे फूल आहे. नाकाजवळ फूल घेत येतात

दरबारी :

लाँग लिव्ह द चक्रमपुर
लाँग लिव्ह द चक्रमपुर किंग!
सगळे मिळून वाजवा बाजा
एकच आमचा चक्रम राजा..
एक महाराज सारा देश आबाद!
चक्रमराजा झिंदाबाद! झिंदाबाद!
राजाधिराज चक्रमादित्य महाराजाचा विजय असो.
जय असो!
सुजय असो!
विजय असो!

*महाराज सिंहासनाला साष्टांग दंडवत घालतात. पाठून कॅमेराचे फ्लॅश लाइट..*

महाराज : आम्ही या सिंहासनाचे आजन्म आमरण सेवक! नियतीने आमच्या हाती ही जबाबदारी सोपवली. ती प्राणात प्राण असेतो पार पाडणे हेच आमचे कर्तव्य. आमचे एकच ध्येय, एकच श्रेय.. चक्रमपुरास अशा उंचीवर न्यावे जिथून इतर सारे लहान दिसतील. ठिपक्यासारखे.

प्रधानजी : होय महाराज! आपण आहात तर सारे शक्य आहे! अगदी अशक्य शब्द नसलेला शब्दकोश ही शक्य आहे! आणि महाराज, आपण स्वत: इतक्या उंचीवर आताच पोहोचलेले आहात. आपणास सारेच लहान दिसत असणार!

महाराज : प्रधांजी, खरंय. दिवसरात्र या देशाचा विचार, मनात देशाच्या प्रगतीचाच विचार. आम्ही म्हणजेच देश. आम्ही म्हणजेच सत्य. आमचा विकास म्हणजे देशाचा विकास. आम्ही म्हणतो तेच एक पूर्ण सत्य. आम्ही म्हणू तोच विकास.

प्रधानजी : होय महाराज! बस एक ही बंदा काफी है!

महाराज : खरंय! या छातीचा कोट करून आम्ही चक्रमपुरास उंचीवर नेत आहोत. ते करता करता आम्हीच उंच कधी नि कसे झालो ते आम्हालाच नाही ठाऊक! उंची अशी की सारी दुनिया ठिपक्यासारखी दिसावी.

आम्ही आता या अवस्थेत पोहोचलो आहोत की बाकी सारे आम्हाला फजूल वाटते. एवढी वर्षे आम्ही शिक्षण घेतले. देश विदेशात शिकलो. आपल्या राज्यास जगभरात मान मिळावा म्हणून अगदी इंग्रजी विद्या ही शिकलो. आज आम्हाला जगभरात मान सन्मान मिळतो. आमच्यामुळे चक्रमपुरास ही. तिथून मग सारे लहान दिसावयास लागले तर आश्चर्य ते काय?

प्रधानजी : होय महाराज! आपली मेहनत, तळमळ आणि अष्टौप्रहर झटणे सगळ्यांनाच दिसते. जनतेसही ते ठाऊक होण्याची व्यवस्था केली आहे आम्ही. आपल्या मेहनतीस फळ आल्यावाचून कसे राहिल?

महाराज : हे सिंहासन म्हणजे आमचा देव. आम्ही याचे सच्चे सेवक. म्हणून अगदी दंडवत घातला आम्ही.

प्रधानजी : होय महाराज! आपली ही कृती म्हणजे आपली राज्याप्रती असलेली निष्ठा दाखवते. आपली ती छायाचित्रे पाहून आपल्या जनतेचा ऊर भरून येईल. तसा यावा म्हणून आपले छायाचित्र चौकाचौकात लावण्याची व्यवस्था केली आहे महाराज. आपल्या गादी समोर नतमस्तक राजास पाहून जनतेस काय वाटेल याचा विचार करूनही अंगावर काटे येतात. आम्हाला आपला अभिमान, गर्व वगैरे आहे हे सांगायलाच हवे महाराज!

महाराज : विनोदबंदीचे पडसाद प्रधांजी?

प्रधानजी : हुकुमनाम्यानुसार सारे चोख पार पडत आहे. विनोदावरच नव्हे तर लहान बालकांचे हास्य सोडून बाकी सर्व हसण्यावर बंदी जाहीर केली आहे. काही कुत्सित लोक राज्यात हसण्यासारखं असे ही काहीच नाही तेव्हा त्यावर बंदीची गरज काय असला प्रश्न उपस्थित करत होते. पण आता हसणे या क्रियेवर नि क्रियापदावर ही बंदी येत आहे. देशातील सर्व हास्योत्पादक गोष्टींवर तडकाफडकी बंदी आणली आहे. इथेही पूर्वलक्षी प्रभावाने बंदी आणल्याने सर्कशीतील विदुषकांसकट इतरही काही विनोद निर्मिती करणाऱ्यांस गजाआड केले गेले आहे. व्यंगचित्रांवर तर करडी नजर ठेवली आहे. साध्या चित्रकारांस सध्या तरी सूट दिली गेली आहे. पण पुढे कधी त्यांनी आपल्या ह्या स्वातंत्र्याचा दुरूपयोग करत हास्यनिर्मिती होईल असले काही कृत्य केल्याचे आढळल्यास त्यांचा ही समावेश या बंदीत करण्यात येईल. एकूण सगळे गंभीर आहे महाराज.

महाराज : असावयासच हवे! देशात इतकी दु:खे असताना नि आम्ही.. अष्टौप्रहर.. चांगला शब्द आहे प्रधांजी.. झटत असताना ह्या विनोदास देशात स्थान नाही. देशभरात एकूण एक विनोद नामक व्यक्तींची नावे तात्काळ बदलण्यात येऊन त्या सर्वांस 'गंभीर' हे नाव देण्यात यावे. तसा हुकूम तात्काळ काढावा.

प्रधानजी : हुकूम महाराज. तात्काळ होईल महाराज. आज्ञा असेल तर हसणे वगैरे क्रियाच नव्हे तर क्रियापदांवरही बंदी घालावी महाराज?

महाराज : अर्थात! अधिकस्य अधिकं फलं! थोडक्यात अतिरेकाचं फळ अतिरेकी मिळतेच! आणि कोणी हास्योत्पादक किंवा कुणी हसण्यासारख्या अतिरेकी कारवाया करत असतील तर त्यांना 'हास्यदहशतवाद कायद्या'नुसार ताब्यात घ्या.

प्रधानजी : पण हा नवीन कायदा? समजलो महाराज. आम्ही कायदा नवीन बनवून घेऊ. त्यास 'हास्यप्रतिबंधक व हास्यदहशतविरोधी (सुधारित) कायदा' असे नाव देऊ!

महाराज : सुधारित? बनण्याआधीच सुधारित कायदा?

प्रधानजी : ॲज अ प्रिकॉशन महाराज! आजवर जे कायदे आपण आणले त्यांना हळूहळू सुधारत नवीन कायदे बनवले आपण! यावेळेस मूळ नावातच 'सुधारित कायदा' म्हणावे अशी सुधारणा कायदे मंत्र्यांनी सुचवली आहे महाराज! मागे काही कायदे अत्यंत कडक होते, म्हणजे त्यातून धनाढ्यांनाही सूट नाही असे मसुदे बनवलेले. मग त्यात हळूहळू सुधारणांचे पाणी घालत त्यांना पातळ बनवले गेले. तर काही कायदे जसजसे दिवस गेले त्याप्रमाणे त्यात दर आठवड्यात गरजेनुसार बदल करण्यात आले. कित्येकदा तर दर दिवशी बदल केले आपण. विरोधक काही म्हणोत की मूळ कायदा बनवताना सर्व बाबी ध्यानात घेतल्या नाहीत. पण काळानुसार बदलण्याचा आदर्श आपण घालून दिला.

त्यामुळे आता मूळ कायद्यासच सुधारित कायदा म्हटले तर कुणीच त्या कायद्यातील बदलांच्याविरोधात बोलू शकणार नाही महाराज.

महाराज : कायदे खात्याची ही सूचना रास्त आहे प्रधांजी. यापुढे कोणताही कायदा 'सुधारित' म्हणूनच बनवण्यात यावा. असा 'नूतन कायदा नामकरण (सुधारित) कायदा' बनवा प्रधांजी.

प्रधानजी : हुकूम महाराज! महाराज, एक समस्या आहे, आता कायदे मोडणारे नि सामजिक व हास्य दहशतवादी कित्येक जण कैदेत आहेत. अर्थात आपल्या न्यायनिष्ठुर कायदे पालनाच्या आदेशाने कित्येक सामान्यजन कायद्याच्या कक्षेबाहेर जाऊ धजत नाहीत हे खरे. पण समस्या अशी आहे की आपल्याला कारागृहांची कमतरता जाणवत आहे. मागील आदेशानुसार राहत्या इमारतींत तुरूंगाची सोय केली गेली आहे. परंतु तेथील मूळ रहिवाशांना राहण्याचे तंबू कमी पडत आहेत महाराज..

महाराज : इतके कडक कायदेकानून पालन! आम्ही प्रसन्न आहोत. परंतु आपली कदाचित गफलत होत असावी. एका कोठडीत एक कैदी ठेवण्याची चैन परवडणारी नाही. माणसाला बोलूनचालून अडीच हात जागा लागते प्रधांजी. आमच्या आध्यात्मिक गुरूंनी हेच शिकवले आम्हास. तेव्हा अडीच हात जागेत एक कैदी ठेवल्यास जागेचा पुरेपूर वापर होईल. आणि 'कारागृह इन्फ्रास्ट्रक्चर सुधारणा (सुधारित) कायदा' बनवा. त्यानुसार कैद्यांच्या संपत्तीवर टाच आणून कारागृह निर्मितीत ती

वापरा. त्यांच्यामुळेच देशाच्या तिजोरीवर भार पडतो आहे. पुढे ते न्यायदानात निर्दोष वगैरे ठरतील असल्या युक्तिवादात अडकू नका. आमच्या राज्यात आम्ही गुन्हेगार अंतर्ज्ञानाने ओळखतो. बाकी न्यायालयांचे येथे काय काम? तेव्हा चक्रमपुरच्या प्रगतीत अशा देशद्रोह्यांस कैदेत ठेवण्यावाचून पर्याय नाही. शिवाय सर्वांस देहदंडाची शिक्षा देता येईल, त्यामुळे तुरुंगात थोडी जागा मोकळी करून घेता येईल. पण जागतिक पातळीवर चक्रमपुरची प्रतिमा कायद्याचे राज्य व्हावी अशी आमची इच्छा आहे. आम्ही म्हणालो तसे, चक्रमपुरीस लोकशाही राज्य बनवण्यासाठी आमचे चिंतन सुरू आहे. लोकशाहीत कैदेत कितीही काळ टाकणे चालते. कायद्याचे कुठले न कुठले कलम त्यासाठी उपयोगी पडतेच, पण देहदंडासाठी ते तसे करता येत नाही. असो.

प्रधानजी : होय महाराज! महाराज एका गंभीर, खरेतर अति गंभीर समस्येकडे लक्ष वेधायचे आहे आपले..

महाराज : बोला प्रधांजी. समस्या म्हटली की ती गंभीरच असायची! पण आम्ही आहोत! आमच्याकडे बंदीअस्त्र आहे. वाढती कारागृहे आहेत. आमच्या दीर्घ चिंतनातून आलेले व वेळोवेळी उपयोगी येतील तसे कालानुरूप सुधारित कायदे कानून आहेत. त्यामुळे चिंता नसावी.

प्रधानजी : आपल्या तडक आणि धडक देखरेख पथका'च्या हाती पुण्यपुरनगरीतून हाती आलेला एक इयत्ता दहावी च्या बालकाने

लिहिलेला निबंध आहे.. त्यातील विचार आम्हाला अस्वस्थ करतात म्हणून गंभीर समस्या म्हटले आम्ही..

महाराज : दीर्घ अथवा प्रदीर्घ नसेल तर वाचावा तो निबंध..

प्रधानजी : होय महाराज! वाचतो.

*टाळी वाजवून शिपायाला बोलवतात, त्याला काही सांगतात. थोड्यावेळात शाळेच्या वहीच्या पानावर लिहिलेले काही घेऊन तो परत येतो.*

प्रधानजी : शाळकरी पोराचा निबंध आहे. आम्ही सखोल चौकशी केली, पण शाळेतील कुणा शिक्षकाने लिहायला सांगितलेला हा निबंध नव्हे. स्वमनाने लिहिलेला आहे. ऐकावे महाराज.. तो 'न सुटलेले माझे प्रश्न' या शीर्षकाखाली लिहितो,

'गेल्याच वर्षीची शाळा नि आजची शाळा यांत किती बदल झाला असावा? आमचे तटकरे गुरूजी मन लावून शिकवायचे. एखाद्या प्रश्नाचे उत्तर कसे द्यावे याबद्दल सांगायचे. कारणे द्या, कारणमीमांसा करा, संकल्पनेचा विस्तार करून लिहा वगैरे प्रश्नातील बारकावे शिकवायचे. गणित व विज्ञान भावी आयुष्याच्या तयारीत फक्त शिक्षणातच नव्हे तर दैनंदिन जीवनात कसे मदत करतात हे सांगायचे. बिचारे तटकरे सर.

आता कुठल्यातरी तुरुंगात बंद आहेत. ते तर बाद झालेच पण शिकवण्यातून प्रश्नोत्तरेही बाद झालीत. नवीन शिक्षक सांगतात, जे पुस्तकात सांगितलेय तेच प्रमाण. मग त्यावर प्रश्न कशाला? सगळीकडे उत्तरेच उत्तरे. एक सर म्हणतात आता देशात प्रश्न असे उरलेच नाहीत म्हणून प्रश्नोत्तरे बाद झालीत. दुसरे सर म्हणतात, आपले चक्रमादित्य महाराज असताना इतर कुणास प्रश्न पडण्याची गरजच काय? पण शाळेतल्या प्रश्नोत्तरांचा याच्याशी संबंध काय विचारले तर उलट प्रश्न विचारला म्हणून मला वर्गाबाहेर काढले. वर मुख्याध्यापकांनी वडलांना बोलावून समज दिली. नक्की काय चुकले माझे असा प्रश्न मी कोणाला विचारावा? वडलांना विचारू तर ते आधीच कावलेले. तेव्हा अशा प्रश्नांची रेडिमेड उत्तरे कुठे मिळतील? की प्रश्न पडूच नयेत म्हणून हे सारे? कुणकुण आलीय कानावर की कदाचित विज्ञान व गणित अजून सोपे करून शिकवले जाईल. उगाच सामान्य बुद्धीच्या विद्यार्थ्यास न्यूनगंड नको म्हणून. म्हणजे हुशार विद्यार्थ्यांमुळे बाकीच्यांना न्यूनगंड येत असेल तर उद्या त्या हुशार विद्यार्थ्यांनाही शिक्षा मिळेल का? प्रश्नोत्तरे इतकी वाईट असतील तर इतकी वर्षे ती कशी चालली? मग आमच्या आधीच्या पिढ्या वाया गेल्यात असे म्हणावे का? प्रश्न खूप आहेत पण यांची उत्तरे कोठे शोधावीत? कुतुहल व जिज्ञासा हे लहान मुलांत जात्याच असणारे गुण. मग त्यांना प्रश्न पडल्यास त्यांनी काय करावे. एका सरांना ते विचारले. त्यांचे नाव सांगितले तर कदाचित त्यांना ही पकडून

नेतील. पण त्यांनी फक्त हाताची घडी आणि तोंडावर बोट एवढेच करून दाखवले. आमची शाळा पूर्वीसारखी परत होणारच नाही का? आमचे शिक्षक पूर्वीसारखे हसताना दिसणारच नाहीत का? मला पूर्वीसारखी मोकळी हवा मिळू शकेल का? कोण सांगेल की कोणाकडे मिळतील या प्रश्नांची उत्तरे? सगळीकडे उत्तरेच उत्तरे आहेत तर हेच प्रश्न त्यातून सुटले कसे? यांचीच उत्तरे का नसावीत? की आहेत पण मला ठाऊक नसावीत? देवास ठाऊक! म्हणून तर कित्येकांस देवाघरी पाठवत नसतील ना सरकारचे लोक. तसं पेपरात छापून येत नाही पण कुजबुजतात लोक. आधी आमच्याकडे 'चक्रमपुर बित्तंबातमी' यायचा. का कोणास ठाऊक. बंद पडला. आता सगळेच 'चक्रमपुर टाइम्स'च वाचतात. त्यात काय असल्या बातम्या नाही येत. पण या कुजबुजणाऱ्या लोकांना कुठून माहिती पडतात कोणास ठाऊक. पण त्यांना प्रश्न मात्र पडत नसावेत. कारण ते शांतपणे जगत असतात. कधी मोठ्या आवाजात बोलत नाहीत नि कधी हसत नाहीत. मग मीच काही वेगळा आहे की काय? न सुटलेल्या नि पडत राहणाऱ्या प्रश्नांची मालिका न सुटणारा!'

महाराज : दहावीतील आहे हा मुलगा?

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : पाहिलंत प्रधांजी? किती बिघडला आहे हा? या आधी त्याला मिळालेल्या शिक्षणाने त्याला प्रश्न पडत आहेत. आम्ही परीक्षा बंद

केल्या, प्रश्नोत्तरे बंद केली. कदाचित थोडा उशीरच झाला त्यास. पण ठीक आहे. आता आम्हाला वाटते की बंदी आणावी ती पूर्ण शिक्षणावरच. उगाच विषाची परीक्षा.

प्रधानजी : होय महाराज! तसा आदेश काढू? सुधारित?

महाराज : थांबावे प्रधांजी. असे तडकाफडकी निर्णय आम्ही घेतो हे खरे आहे. पण इकडे तसे चालायचे नाही. एक तर लवकरच आम्ही राजपद सोडून देशाचे राष्ट्रपती होण्याची तयारी करणार आहोत. लोकशाहीची स्थापना करून पूर्ण जगात आम्हास प्रतिष्ठा मिळेल. आम्हाला प्रतिष्ठा म्हणजे पर्यायाने चक्रमपुरास प्रतिष्ठा. त्यासाठी शिक्षण व्यवस्था बंद पाडून चालेल कसे? उलट शिक्षण व्यवस्था उत्तम असल्याचे चित्र उभारावे लागेल. गावागावात शाळा उघडा. नव्याने शिक्षण कामगारांची भरती करा. शिक्षितांस त्यांस शिक्षण देण्याची कंत्राटी नोकरी द्या. त्यामुळे कित्येक गोष्टी साधतील. शिक्षणप्रसाराचा आम्ही वसा घेतला आहे हे जगास दिसेल. शाळा वाढल्याने शिक्षण कामाठी अर्थात शिक्षकांच्या नोकऱ्या वाढून बेरोजगारी कमी होईल. आणि सर्वात महत्वाचे, शिक्षण देऊन सुद्धा अशा अर्धशिक्षित शिक्षकांनी दिलेल्या शिक्षणाचा दर्जा काय असेल याची कल्पना यावी आपल्याला. बालके आपल्याला हवे तेच आणि तितकेच शिकतील. आम्हालाही पुढे कारकुनांची गरज तर आहेच ना? ती पुरवली जाईल. जास्त शिकून विचार करणारी लोकांची जमात

हळूहळू नामशेष होईल. थोडक्यात शिक्षण बंदी उघड न करता मागील दरवाज्यातून घडवून आणा. आम्ही म्हटले तसे, अघोषित बंदी ही घोषित बंदीहून जास्त उपयुक्त असू शकते!

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : हे काम तात्काळ हाती घ्या. 'शिक्षण प्रसार व प्रचार सुधारणा (सुधारित) कायदा' अमलात आणा. त्यात या साऱ्या घोषणा होऊन जाऊद्यात!

प्रधानजी : हुकूम महाराज!

महाराज : प्रधांजी, आज आम्हाला ते वृत्तपत्रे नसल्याने मिळणारे स्वातंत्र्य म्हणजे काय याची जाणीव होते आहे! आमच्या पिताजींना दरबारात काही उघडपणे बोलता येत नसे. त्यांना गुप्त खलबती कराव्या लागत. पण आम्ही भिंतीचे कान नि डोळे बंद करून टाकले. वृत्तपत्रांची राज्यास असणारी भीती आम्ही काढून टाकली. म्हणून आम्ही मुक्तपणे असे बोलू शकत आहोत. प्रत्यक्ष शक्तिमान राजसिंहासनास वेसण घालू शकणारी ही वृत्तपत्रे काय कामाची? पण आपल्या वृत्तसुधार कार्यक्रमाने आम्ही आता मोकळा श्वास घेऊ शकत आहोत.

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आम्ही आता खरेतर थकलो आहोत. एका लहान बालकाच्या मस्तकातील प्रश्नांनी आम्ही थकलो आहोत! अजून किती मजल आम्हाला मारायची आहे याचा अंदाज घेत आहोत.. दरबार बरखास्त!

प्रधानजी : हुकूम महाराज!

दरबारी :

महाराज चक्रमादित्यांचा विजय असो..
विजय असो!
हैल किंग चक्रम!
लाँग लिव्ह चक्रम किंग!
लांब जगा चक्रमादित्य!
प्रश्न आऊट.. उत्तरे आत
चक्रमादित्याची एकच बात!
झिंदाबाद! झिंदाबाद!
किंग चक्रमादित्या झिंदाबाद!

६.

# ज्ञान विरोधी वि-ज्ञान बंदी!




नेहमी सुटाबुटात असलेले महाराज आज सदरा नि धोतरात आहेत. डोक्यावर टोपी. गळ्यात उपरणे. त्यांच्या गाडी पुढे घोड्यांचे कट आऊट्स. त्यामुळे गाडी रथासारखी वाटते. महाराज सर्वांना हात हलवून अभिवादन करतात. मग वाकून नमस्कार. येऊन सिंहासनावर बसतात.

दरबारी :

चक्रमपुर हृदय सम्राट चक्रमपुर चक्रवर्ती चक्रम राजा चक्रमादित्य पधार रहे हैं

निगाह रखो!

नजर रखो!

सावधान होशियार!

एक बंदा काफी है!

दूसरोंको नहीं माफी है!

चक्रम महाराजांचा विजय असो!

विजय असो! विजय असो!

महाराज : प्रधांजी.. गुड मॉर्निंग!

प्रधानजी : सुप्रभात महाराज. आकाशी सूर्य तसे चक्रमपुरी आपण. आपल्या तेजोकिरणांनी उजळले अवघे चक्रमपुर. त्या प्रकाशात सर्व देश, सर्व राज्य चमकत आहे महाराज. आम्ही दररोज विचार करतो की, चक्रमपुराचे भाग्य किती थोर म्हणून प्रत्यक्ष भगवंताने आपल्याला पृथ्वीतलावर या चक्रमपुरीत पाठवले. सुदर्शन चक्रासारखे आपण आमच्या हाती दिलेले आदेशांचे आयुध व त्यांच्या सक्त अंमलबजावणीने देशभरात पसरलेली शांतता, देशभर वाहणारे शांतीचे व प्रगतीचे विकास वारे व दुनियाभरचे दिपलेले डोळे. आज साऱ्या जगताचे लक्ष लागले आहे ते या चक्रम महाराजांकडे, म्हणजे चक्रमपुराकडेच. आमचे सौभाग्य की असे महाराज आम्हास लाभले.

महाराज : आमच्या पिताश्रींची शिकवण व शिकवणूक ती. मागे त्यांची दरबारात आरती होई. पण आम्हास ते पटत नाही. आम्ही ह्या सिंहासनाचे साधे सेवक. या देशास उन्नतीपथावर नेणे हे एकच जीवित कार्य आमचे. त्यासाठी जे जे हवे ते सारे आम्ही करत आहोत.

प्रधानजी : होय महाराज! प्रगतीपथावर सुसाट निघालेली ही विकासाची गाडी आता थांबणार नाही. कारण महामार्ग ही आपणच बनवलेत, त्यावरून

जाणारा रथ ही आपलाच, त्याचे घोडे ही आपले, हाकणारे आपणच.. आणि लगाम ही आपल्या हाती!

महाराज : सत्य आहे प्रधांजी सत्य आहे! लगामाविण प्रगतीपथावर वाटचाल म्हणजे अंधारात निबीड अरण्यात चालणे. आम्हास ते परवडणारे नाही. सुसाट गाडी चालवण्यास रस्ता मोकळाच हवा नि हाती लगामही हवा! तिथे अन्य गाड्याही नकोत. म्हणून तर आम्हाला अडथळा आणणारे शंकासुर विरोधक आवडत नाहीत. उगाच प्रश्न विचारत प्रश्नात पाडणारे खपत नाहीत. आम्ही तडक निर्णय फडक कारवाई करतो. आमच्या डोळ्यांसमोर पुढील दहा वर्षांचा काळ आहे ज्यात आम्ही निर्वेध, निर्घोर कार्य करू शकू. आमच्या बंदीसत्रांमागचे उद्दिष्ट उदात्त आहे! उगाच नव्हे दुनियाभरात चक्रमादित्याची चलती.. म्हणजे चक्रमपुराची चलती आहे! बरे, प्रधांजी त्या शालेय शिक्षण सुधार कार्यक्रमांबद्दल सांगावे.

प्रधानजी : सांगावे असे काही नाही महाराज. नेहमीप्रमाणे शिक्षणतज्ञ म्हणवणारी जमात तडमडली मध्ये. शिक्षणाचा दर्जा खालावेल वगैरे वगैरे नेहमीचे रडगाणे. पण त्याच सुमारास चक्रमपुर टाइम्समध्ये या धोरणाबद्दल अभ्यासपूर्ण लेख छापून आणले होते. जनमत त्यामुळे पूर्णपणे आपल्या बाजूस आहे. जनसामान्यांनी ह्या तज्ञ म्हणवणाऱ्यांची मिजास का खपवून घ्यावी? सामान्यांस शिक्षण मिळेल, सामान्य शिक्षितास शिक्षकाची नोकरी मिळेल तर या तज्ञांच्या पोटात का दुखावे? लोकमत असे आहे

की तज्ञ म्हणवणाऱ्या मंडळींस आपली दुकाने बंद पडण्याची भीती आहे म्हणून ते या शैक्षणिक सुधारणांवर टीका करत आहेत. नाहीतर एकदा महाराजांचा हुकूम झाला तर त्यावर टीकाच काय, चर्चाही करावयास नको.

महाराज : आम्ही प्रसन्न आहोत!

प्रधानजी : थ्यांक्स महाराज. आपल्या शिक्षणप्रसार व प्रचार कार्याची दखल बाहेरील देशात घेतली जात आहे महाराज. तशी वृत्ते आहेत.

महाराज : होय प्रधानजी. आमच्या नजरेत चक्रमपुर हा लोकशाही देश झालेला दिसत आहे. त्या दृष्टीने आम्ही पावले टाकत आहोत. लोकशाहीस जगभरात मिळणारा मान काही अलगच आहे. त्या दृष्टीने आम्ही चिंतन करत आहोतच. पण ह्या शिक्षण प्रसाराच्या वृत्ताचा आमच्या प्रागतिक दृष्टिकोनाचा दाखला म्हणून नक्कीच उपयोग होईल. आम्ही खूपच खूश आहोत प्रधांजी.

प्रधानजी : आपण खूश तर आम्ही खूश! महाराज खूश तर जनता खूश!

महाराज : एकूण सारे सुरळीत सुरू आहे असे दिसते आहे!

प्रधानजी : होय महाराज! या आघाडीवर सारे काही आलबेल..

महाराज : म्हणजे ऑल वेल! छान! पण आजचा राज्यकारभार बाकी आहे! आजचा बंदी घालण्याचा मुद्दा अजून पुढे आला नाही?

प्रधानजी : माफी असावी महाराज. इतर बाबतीत बोलण्यात दरबाराचे मुख्य काम मागे पडले. आम्ही क्षमा मागतो. (टाळी वाजवत) शिपाई, आणा रे त्याला..

*शिपाई एका मध्यमवयीन माणसास हात पाय बांधून दरबारात आणतात. पाय बांधल्याने दोन्ही शिपाई त्याला पकडून उभे राहतात.*

महाराज : कोण गुन्हेगार हा? सामाजिक अतिरेकी की हास्य दहशतवादी? की शाळा कॉलेजात प्रश्नपत्रिका बनवणारा कोणी? चेहऱ्यावरून वाटतो तो असाच कुणी प्रोफेसरबिफेसर किंवा शिक्षक.

प्रधानजी : होय महाराज! तुमच्या नजरेतून काहीच सुटत नाही महाराज! हा प्रोफेसरच आहे पण नुसताच सामाजिक दहशतवाद नव्हे तर वैज्ञानिक अंधश्रद्धा पसरवण्यासारखे घातक कृत्य केले आहे याने. त्यासाठी आपल्या जानबाज सैनिकांनी यास पकडून आणले आहे.

महाराज : वैज्ञानिक अंधश्रद्धा?

प्रधानजी : होय महाराज! आपल्या सैनिकांचे बारकाईने लक्ष असते. सदा सतर्क असतात ते. त्यामुळेच हा वैज्ञानिक बुवा हाती लागला महाराज!

महाराज : वैज्ञानिक बुवा? आम्हाला नाही कळले बुवा!

प्रधानजी : या प्राध्यापक प्रबुद्ध प्रयाग नावाच्या प्राध्यापकाच्या घरात एक लिखाण सापडले. आम्ही ते अनर्थकारक लेख वाचले आहेत. त्यात आपल्या आर्यभट्टादि पूर्वजांबद्दल नि त्याकाळच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाबद्दल लिहिले आहे. नंतर मात्र त्यांची लेखणी घसरलेली आहे. त्यांचा अर्थ इतकाच की काही पन्नास एक वर्षांपूर्वी आपला मृत्युदर कित्येक पटींनी जास्त होता. विविध साथरोगांस बळी पडणाऱ्यांची संख्या जास्त होती. आधुनिक विज्ञानामुळे.. म्हणजे महाराज, पाश्चात्य विद्येने.. यात घट झाली असून माणसाचे सरासरी आयुर्मान वाढले आहे! अजूनही काही मासले..

महाराज : प्रधांजी, आयुर्मान वाढले, साथरोग घटले हे सारे बरोबरच आहे. प्रगतीशील चक्रमपुर आहे हे. पण यांचा संबंध आधुनिक विज्ञानाशी कसा?

प्रधानजी : अर्थात महाराज. हा प्रमाद हा प्रयाग नामक गृहस्थ करताना आढळला. वास्तविक हजारो वर्षांचा आपल्याला वारसा मिळाला आहे. तेव्हा ऋषीमुनी हजारो वर्षे जगत असत. तेव्हा न डेंग्यू होता ना हिवताप! असे असताना आधुनिक विज्ञानाची तरफदारी करावी याने? आम्हास तर वाटते हे नवनवीन आजारच या विज्ञानाने तयार केले नि मग उपचार करून वैज्ञानिक प्रगती झाल्याचा देखावा उभा केला!

महाराज : खरंय प्रधांजी. उज्वल भूतकाळातच उज्वल भविष्याची बीजे असतात. पण याच्यासारखे वैज्ञानिक अंधश्रद्ध याचा विचार करणार नाहीत! पन्नास शंभर वर्षांपूर्वी असेलही मृत्युदर जास्त पण हजारो वर्षांपूर्वीचे काय? उगाच आधुनिक विज्ञानाची तरफदारी करण्यासाठी आपल्या वारशाकडे कुत्सित नजरेने पाहणे अशा सुशिक्षित पांढरपेशांसच जमू शकते. याच्यापेक्षा आमचा अडाणी सामान्य नागरिक बरा! तो आमच्या सांगण्याबाहेर नाही. आणि असले घातक विचार तो करत नाही. त्याला दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असेल तर उगाच या असल्या कागाळ्या तो करत बसणार नाही. पण या सुशिक्षितांचा हाच प्रा ॅब्लेम आहे. हे लोक इतरांना गुमराह करतील. परत आव कसला? तर विद्वत्तेचा! आम्ही म्हणालो होतो ते निर्विवाद सत्य आहे!

प्रधानजी : कोणते महाराज? नाही, म्हणजे आपण साक्षात सत्याचे पाईक. सत्याचा दुसरा अवतार. आपण इतकी सारी शाश्वत सत्ये सांगत असता. तेव्हा नक्की कोणते सत्य..

महाराज : तेच. प्रश्न उपस्थित करणे! तथाकथित विज्ञान प्रश्न उपस्थित करते, करायला शिकवते. प्रयोग करायला शिकवते. रेडिमेड ज्ञानावर अविश्वास दाखवायला शिकवते. असला अविश्वास जो अंतिमत: मानवतेस घातक ठरेल. हे एक सत्य आहे! विश्वासावर विश्व चालते. राजावरील विश्वासाने प्रजाजन सुखाने निद्राधीन होतात. पण माणूस शिकत चालला की

त्याच्यात हे अविश्वासाचे दुर्गुण येतातच की काय न कळे! विज्ञानाने समाजाची ही मोठी हानी केली आहे प्रधांजी.

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : प्रश्न उपस्थित करणे हे राजास घातक, राज्यास घातक, समाज विघातक आणि अंतिमत: मानवतेस घातक! असल्या या विज्ञानावर बंदी आणण्यावाचून पर्याय नाही!

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आम्ही 'या' विज्ञानावर म्हणालो प्रधांजी हे ध्यानात घ्या. आपल्या प्राचीन विद्या व शास्त्रे पुराणे यात येत नाहीत. खरेतर प्राचीन कालीन संस्कृतीतच प्रगतीची बीजे आहेत. तिचे पुनरूज्जीवन व्हावे. शास्त्र म्हणजे सायन्स नव्हे! भौतिक, रसायन, जीवशास्त्र तर नव्हेच नव्हे! शास्त्रे म्हणजे आपल्या पोथ्यापुराणात सांगितलेले सारे. आधुनिक विज्ञानावर तात्काळ बंदी आणा नि ही जुनी, प्राचीन, प्रागतिक व समृद्ध वारसा असलेली शास्त्रे शाळाकॉलेजांतून शिकवावयास सुरूवात करा. तशी पाठ्यपुस्तके लिहावयास घ्या. ती लिहून होईतोवर शाळा कॉलेजांस सुटी द्या. काळ अनंत आहे! त्या पार्श्वभूमीवर सहा महिने ते एक वर्ष शाळा कॉलेज बंद राहिल्याने काही बिघडत नाही! पण विज्ञानाने विद्यार्थ्यांची मने कलुषित होऊ देऊ नका. आम्ही म्हणतो, विज्ञान हा खरेतर ज्ञानाचा विरूद्धार्थी शब्द! ज्ञानाचा विरोध करते ते वि ज्ञान! पण काही स्वत:स

शास्त्रज्ञ समजणाऱ्या ढुढ्ढाचार्यांमुळे विज्ञान व प्रगतीचा अन्योन्य संबंध जोडला गेला आहे! पण सत्य याच्या अगदी विपरीत आहे!

प्रधानजी : 'आधुनिक विज्ञान बंदी (सुधारित) कायदा' तात्काळ बनवून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करतो महाराज! म्हणजे सर्व शास्त्रज्ञ व शास्त्राचे विद्यार्थी या कायद्याच्या कक्षेत येतील. आपल्या कारागृह सुधारणांच्या धडाकेबाज कार्यक्रमानंतर तुरूंगात जागा कमी पडणार नाही! आणि कित्येक प्रजाजन असे कारागृहात शिफ्ट होणार असतील तर राहत्या घरांची समस्या ही सुटण्यास मदत होईल महाराज!

महाराज : सत्य आहे प्रधानजी! इथे आम्ही अजून एक मुद्दा मांडतो. आमच्या चिंतनातून उमगलेला. माणसाची मोठमोठी घरे ही त्या माणसाच्या आध्यात्मिक प्रगतीस मारक. खरेतर स्वत:चे घर ही संकल्पना आध्यात्मिकतेच्या विपरीत. गुरूजी सांगून गेले, या जगात आपले काही नाही. हा देह ही भाडेतत्वावर आत्म्यास मिळालेला आहे! तेव्हा माझे घर नि माझे दार असले माझे माझे म्हणावयास काही हवेच कशास? त्यापेक्षा तुरुंगातील अडीच हात जागा ही मोक्षाची गॅरंटी! आणि हे कैदी ही आमचेच चक्रमपुराचे नागरिक. तेव्हा त्यांच्याही आध्यात्मिक उन्नतीकडे आम्ही राजा म्हणून लक्ष द्यायला हवे!

प्रधानजी : आपण ग्रेट आहात महाराज!

महाराज : हा बंदी आदेश काढा.. सुधारित. एक एक समस्या पाहून आम्हाला ध्यानात येते की किती मजल अजून मारणे बाकी आहे! तरीही आम्ही दक्ष आहोत, चाणाक्ष आहोत..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आमच्या डोळ्यांसमोर पुढील दशकाचे चित्र उभे राहात आहे. पुढील दहा वर्षे आमची.. म्हणजे आपली! चक्रमादित्याची! म्हणजे चक्रमपुरची!

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : तेव्हा आम्हाला चिंतन मननास समय हवा! दरबार बरखास्त!

प्रधानजी : जशी आपली दरख्वास्त!

दरबारी :

बाकी सब आएगा बाद!
चक्रमादित्य झिंदाबाद!
पुरी चक्रमपुरकी पूरी मुराद!
चक्रमादित्य झिंदाबाद!
बस एक बंदा काफी है!
चक्रमादित्य इन्साफी है!
झिंदाबाद! झिंदाबाद!
चक्रमादित्य झिंदाबाद!

७.

## न्यायान्याय!



सुटाबुटातले महाराज हेलिकॉप्टरातून डायरेक्ट उडी मारत दरबारात. उडी मारायला ते हवेत लटकणारी शिडी वापरतात. हातात एक गुलाबाचे फूल आहे. दुसऱ्या हातात एक तराजू! डोळ्यावर एक पट्टी. ती हळूच किलकिली करत पाहात येतात. मग ती पट्टी काढून टाकतात.

दरबारी :

चक्रम महाराजांचा विजय असो!

ही बंदी ती बंदी

चक्रमपुरची तटबंदी!

सारे सारे रहे आबाद!

चक्रमादित्य झिंदाबाद!

चक्रमादित्य महाराजांचा विजय असो!

विजय असो!

महाराजांचे आज कुठेच लक्ष नाही. आपल्याच विचारात एका तंद्रीत सिंहासनावर बसतात. स्वगत म्हटल्यासारखे बोलू लागतात.

महाराज : आम्ही आणि चक्रमपुर! आम्हाला सदा चिंता फक्त प्रजाजनांचीच! विचार करा.. आम्हीच नसलो तर? आम्ही आहोत तर राज्य आहे. आम्ही आहोत तर देश आहे. देश आहे म्हणून प्रजाजन आहेत. प्रजेसाठी तरी आम्हाला स्वहित जपावेच लागेल. आम्ही जपू. प्राणपणाने जपू! राजकारण हाच राजाचा श्वास, उश्वास! आणि नि:श्वास ही!

राजकारण! म्हणजे पॉलिटिक्स. खरेतर पॉलिट्रिक्सच! ट्रिक्स केल्याशिवाय राज आणि राज्यकारण होतेय थोडीच! तशा ट्रिक्स आम्ही ही करतो. पाबंदी आणि बंदी आमचा आवडता मार्ग. अर्थात कोठे, कधी, कशी किंवा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष बंदी आणावी हे आम्ही पुरेपूर जाणतोच. आता अलिकडचे बघा. प्रथम ती वृत्तपत्रे बंद पडली.. सुंठीवाचून खोकला घालवला! जनहितासाठी हे जरूरी आहेच. वृत्तपत्रे समाजातील नकारात्मकता वाढवत असतील तर अशा नकारात्मकतेस आम्हाला हाकलवून लावायलाच हवे. अर्थात आम्ही चक्रमपुरात लोकशाही

आणण्याचे स्वप्न पाहातो आहोत. जगभरात लोकशाहीला मिळणारा मान वेगळाच. आणि लोकशाहीत वृत्तपत्रे महत्वाची म्हणे! पण वेळ येताच चक्रमपुर टाइम्स सारखी तीन चार वृत्तपत्रे आणता येतील चक्रमपुर बाजारात. लोकशाही म्हणायची तर ही कमिटमेंट दाखवावीच लागेल. ती दाखवणे कठीण नाहीच. आता आम्ही निदर्शनेही बंद केली.. निदर्शने करताहेत येता जाता! आंदोलनजीवी कुठले! एकतर त्यांना माहिती आहे, आम्ही माघार कधी घेत नाही. माघार कोण घेतो? जो चुकतो तो! आम्ही कधीच चुकत नाही! आम्ही सर्वज्ञच. सर्व विषय तज्ञ. नाही. तसे नसू ही. पण विविध विषयातील तथाकथित तज्ञांपुढे आमची कळकळ? ती तर शंभर टक्केच ना? मग आंदोलनात वृथा वेळ दवडावा? ते निदर्शने करणार. आम्ही ते ऐकत बसणार. आमचे म्हणणे त्या अति.. नाही दीड शहाण्यांना कळणार आहे? अर्थातच नाही. त्यासाठी मग निदर्शनांपाठोपाठ प्रश्न बंदी! उगाच कुणीही उठून प्रश्नांची टिकली वाजवून जावे? कालापव्यय नुसता! आणि आम्ही.. प्रत्यक्ष आम्ही, उत्तरे द्यावीत? आम्ही पाठशाळेत जायचो.. महाविद्यालयात ही. आमच्या पिताश्रींच्या कडक आज्ञा होत्या.. युवराज कुठलीही परीक्षा देणार नाहीत! कारण प्रश्नांचा आम्हास तेव्हापासून तिटकारा आहे! आणि प्रश्नोत्तरात वाया घालवण्याइतका वेळ आहे कुणाकडे? आणि आम्ही म्हणजेच प्रश्नांचे उत्तर आहोत! आम्ही विनोद नि हास्यबंदी घडवून आणली. आधुनिक विज्ञान नामक थोतांडाचे थोबाड बंद करवले.

शिक्षणातून फक्त राज्य चालवणाऱ्या कारकुनांची सोय करवत आहोत आम्ही. आमच्या साऱ्या कृतींमागे एकच आस.. एकच ध्यास.. एकच आचार नि एकच विचार.. चक्रमादित्याचे नाव दुमदुमत ठेवावे.. आमचे म्हणजेच चक्रमपुराचे. आमच्यापासून राज्यास व राज्यापासून आम्हाला दूर केले तर राहिल काय? पण नाही! थोडेफार उरलेले विरोधी विचारांचे लोक. नाही नाही त्या शंका घेतात. खुसपटे काढतात. अशांचा बंदोबस्त करावयास हवा. विरोधाची विषवल्ली झटपट फोफावते.. पिताजी सांगून गेलेत. त्यांना मुळापासूनच ठेचावे. साम, दाम, दंड किंवा भेद.. नीती वापरून. उगाच नीती अनीतीच्या, न्याय-अन्यायाच्या वायफळ गप्पा नकोत! साम दाम दंड भेद! या चारही गोष्टींनाही नीतीच म्हणतात! अनीती नव्हे! आता लवकरच आम्ही पुढची पावले उचलू.. प्रगती की ओर एक कदम! अर्थात या विरोधकांनी नि नानाविध समस्यांनी तसा मोकळा श्वास घेऊ दिला तर! जेव्हापासून ह्या सिंहासनावर बसलो आहोत एक दिवस असा नाही की आम्हाला शांततेने हा राजमुकुट घालता यावा..

*दोन क्षण शांतता..*

प्रधानजी : महाराजांचा मूड काही अलग दिसतो आज.. आम्ही अचंबित होऊन आपला कारभार पाहातो. प्रत्यक्ष देवावतार आपण!

महाराज : असू. पण प्रत्यक्ष भगवंतास कष्ट कुठे चुकले? तेव्हा हे राज्यचालनाचे व राज्यपालनाचे कठोर व्रत आम्ही अंगीकारले आहे.. खरेतर त्या जगन्नियंत्याचीच तशी इच्छा असावी. नाहीतर आमच्या पिताजींना अकाली मृत्यू आला नसता. आमचे दुर्दैव हेच, खुसपटकांनी त्यातही आमचाच हात असल्याची टीका केली. प्रत्यक्ष जन्मदात्याची हत्या? या गादीसाठी? अशी खुसपटे काढणारे कपटी खुस्पटक काही कमी नाहीत. आमचे आयुष्य असे टक्केटोणपे खातच जात आहे.. बोला.. आम्हास ठाऊक आहे आजचा मुख्य मुद्दा.. कानावर कुणकुण आली आहे आमच्या. आणि हे असे कधीतरी होणार याचा अंदाज होता आम्हास..

प्रधानजी : होय महाराज! आपणास सर्व बाबींचा आगाऊ अंदाज आल्यावाचून राहात नाही. सत्य आहे महाराज!

महाराज : बोला प्रधांजी. न्यायालयातील कारभाराबद्दल सांगा. ती कुणकुण कानी आली नि आम्ही व्यथित झालो. त्या समस्येवर आमच्याकडे इलाज नाही असे नाही. पण आम्ही असे समस्या समाधान करण्यातच व्यस्त झालो तर आमच्या इतर कल्याणकारी कामातील वेळेवर व्यस्त परिणाम होतो त्याचे काय? किती आघाड्यांवर लढणार? तसे आम्ही घाबरत नाही. आम्ही एकदा म्हणालेलो, बस! एक ही बंदा काफी है!

फक्त वाईट वाटते ते एकच.. या सर्वांस आमची कळकळ समजत नाही? देशाचे कल्याण कशात आहे हे उमजत नाही?

प्रधानजी : होय महाराज! आम्हाला आपली व्यथा समजते.

महाराज : काही एक विचार करून आम्ही न्यायाधीश पदावरील व्यक्तीस रामशास्त्री संबोधलेले.. तर ते स्वत:स खरेच रामशास्त्री समजू लागले की काय? नैतिकतेची नशा नैतिकतेहून जास्त घातक असते!

प्रधानजी : होय महाराज! चक्रमपुर टाइम्स मधील सरकारी जाहिराती बंदी आणण्याआधी पासूनच्या आहेत. त्यावर आक्षेप घेण्यात आला. इतर वृत्तपत्रांवर बंदी आली. काही मालक व संपादक आपल्या अडीच हातभर तुरूंगात आहेत. चक्रमपुर टाइम्सवर नि त्याच्या संपादकांवर पूर्वलक्षी प्रभावाने बंदी आणावी या बद्दल न्यायालयाने सरकारचे म्हणजे महाराजांचे मत मागवले आहे..

महाराज : हे तर अजूनच धोकादायक आहे. आम्ही मागे बोललो होतो, न्यायदान व न्यायव्यवस्था निरपेक्ष असावी.. कायद्यापुढे सारेच समान असावेत.. वगैरे. पण हे सारे खरे मानण्याइतके न्यायमूर्ती निर्बुद्ध निघावेत? सारे समान असतात.. पण काही अधिक समान असतात इतपत न्यायाचे ज्ञान त्यांना नसावे? कायदा गाढव असेलही पण तो राबवणारे? त्यांनी गाढवपणा करण्याची काय गरज? प्रधांजी.. आम्हाला सांगा शून्याची किंमत किती?

प्रधानजी : आपण विचारलेला प्रश्न म्हणजे ती शून्य नसून इतर काही असणार!

महाराज : सत्य! शून्याची किंमत नेहमीच शून्य नसते.. तर तो संख्येत डावीकडे आहे की उजवीकडे यावर ती ठरते. माणसांचे ही तसेच आहे. तो राज्यव्यवस्थेजवळील आहे की दूरचा हे न्यायव्यवस्थेने ध्यानात घ्यावयास नको? नाहीतर मनुष्याची किंमत खरेच त्या शून्यासारखी असते. हा न्याय न्यायमूर्तींस कळावयास नको? न्यायदेवता डोळयावर पट्टी बांधून आंधळी होते. खरोखरीची अंध नसते ती. क्षणासाठी पट्टी किलकिली करणे शक्य असते तिला. म्हणून तर ती पट्टी बांधलेली असते. हातातील तराजूच्या तागडीत एक बाजू जड असेल तर दुसरीकडे किलकिल्या डोळयांनी वजन ठेवण्याचे कर्तव्य तिने पार पाडावयास नको?

प्रधानजी : आम्ही आपली उद्विग्नता समजू शकतो महाराज.

महाराज : उद्विग्नता तर आहेच. अगदी उच्चपदस्थच असे वागावयास लागले तर आम्ही कारभार काय दशभुजांनी करावा? चक्रमपुर टाइम्स कोणाचे वृत्तपत्र आहे याचा अंदाजही त्या तथाकथित रामशास्त्र्यांस नसावा? ह्या समस्येतून तर आम्ही सहज बाहेर पडू. पण प्रश्न व्यवस्थेचा आहे. आम्ही एक सिस्टीम बनवली आहे तिच्या बाहेर कुणी जाऊ नये इतकी ही माफक अपेक्षा आम्ही ठेऊ नये? चक्रमपुराचे कल्याण कशात आहे हे आमच्याहून कोणा दुसऱ्यास कळत नाही. हे इतरांस कळू नये. उद्या

न्यायमूर्तींप्रमाणेच बाकी सारे मनमानी करावयास लागले तर राज्य प्रगतीपथावर जाणार कसे? आम्ही कुठे कुठे पुरे पडणार? म्हणून आज आम्ही अस्वस्थ आहोत. एक राज्य म्हणून अजून किती काम करावयाचे बाकी आहे हा विचार करून..

प्रधानजी : आपण क्रोधित न व्हावे महाराज.

महाराज : आम्ही क्रोधितच नव्हे तर व्यथित देखील आहोत. खरेतर मामला गंभीर नाही. न्यायालयास अशा केसेस कशा हाताळाव्यात ते ठाऊक नसावे? एकतर त्या नोंदवूच नयेत. नोंदवाव्या लागल्या तर त्यांवर कार्यवाही करावीच असे बंधन नाही. कार्यवाहीस किती कालावधी लावावा याचे नियम संदिग्ध असताना न्यायमूर्तींस तात्काळ न्यायदानाचा विंचू चावून त्याची विषबाधा व्हावी? कालापव्यय ही कित्येक केसेससाठी न्यायदानातील खास उपाययोजना आहे हे उच्चतम न्यायमूर्तींस समजू नये? आम्ही काळजीपूर्वक कायदे बनवतो, त्यातून खास मंडळींस सुटण्यासाठी छुपे रस्ते सोडतो.. इतके सारे करूनही न्यायमूर्तींकडून अशी चूक व्हावी?

प्रधानजी : महाराजांनी न्यायमूर्तींस बडतर्फ करावे..

महाराज : नाही. प्रधांजी अशी चूक म्हणजे पायावर धोंडा पाडून घेणे! लवकरात लवकर त्या रामशास्त्रींच्या आर्थिक गैरव्यवहाराच्या बातम्या छापून आणा. त्यांचा तपशील आम्हाला विचारू नका. तितपत कल्पनाशक्ती

आपल्या हाताखालील कर्मचारी वर्गाकडे आहेच! अगदी कानोकानी खबर पोहोचवून न्यायमूर्तींबद्दल संशयाचे जाळे पसरवा. त्या जाळ्यात ते अलगद अडकले की पुढील कारवाई! तोवर ही चक्रमपुर टाइम्सवरील कारवाईची बातमी विस्मरणात जाईलच. आमच्याच तिजोरीतून पगार घेऊन तिलाच छेद देणाऱ्यास अशीच सजा हवी! नवीन कार्यनिष्ठ न्यायमूर्तींचा शोध सुरू करा.

प्रधानजी : हुकूम महाराज!

महाराज : पण या निमित्ताने आम्ही एक सुधारणा करू इच्छितो. कदाचित त्या भगवंताच्या मनात हेच असावे म्हणून हा प्रसंग ओढवला असावा. वाईटातून चांगले निघते.. नसेल तर आम्ही ते काढतोच!

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आजवर न्यायालयांची मनमानी आम्ही सहन केली. आम्हीच नेमलेले न्यायमूर्ती. आम्हीच त्यांचा पगार देतो. त्यांनी आम्हालाच प्रश्न विचारावेत? नाही! या पुढे राज्यात न्यायालय असेल. न्यायाधीश असतील. सर्व न्यायदानाचे काम नेहमीप्रमाणे चालेल. पण कोणत्याही खटल्यातील कोणताही निर्णय अंतिमत: आमचाच असेल. सर्वच प्रकरणांत लक्ष घालण्याइतके आम्ही मोकळे नाही. पण आम्हास हव्या त्या निवडक प्रकरणांत आम्ही लक्ष घालू. आणि आमचा निर्णय न्यायालयास बंधनकारक असेल.

प्रधानजी : आपण सर्वज्ञानी आहात महाराज..

महाराज : आम्ही सारेच जाणतो तेव्हा आमच्यापुढे साक्षी नि पुराव्यांची काय ती मातब्बरी? तेव्हा ही सुधारणा तातडीने करा..

प्रधानजी : तातडीने आणि पूर्वलक्षी प्रभावाने?

महाराज : अर्थातच! म्हणजे या चक्रमपुर टाइम्सच्या बाबतीतही आमचाच निर्णय अंतिम असेल. न्यायदानाचे पवित्र कार्य ही आमच्याच हातून व्हावे अशीच त्या भगवंताची इच्छा दिसतेय! आनंद आहे! आणि आज एक वेगळेच समाधान आहे प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज! महाराजांना समाधान तर आम्हाला समाधान. आणि तमाम चक्रमपुरला समाधान!

महाराज : कसले समाधान ते नाही विचारलेत?

प्रधानजी : होय महाराज! पण आपण ते सांगालच ना महाराज!

महाराज : शाबास प्रधांजी! आपली नियुक्ती प्रधांजी म्हणून अतियोग्य. आपण प्रश्न विचारत नाही! आम्हाला प्रश्नोत्तरे आवडत नाहीत! आम्हाला आठवतेय.. आम्ही लहान होतो तेव्हा दरबार, दरबार खेळायचो प्रधांजी. युवराज म्हणून आम्ही सदैव सिंहासनावर. मग आमचे कुणी मित्र सेनापती, कुणी प्रधान तर कुणी न्यायमूर्ती. आम्हाला वाटायचे तेव्हा, आपण न्यायमूर्ती बनावे. पण युवराज आम्ही, राजा बनायचो. न्यायाधीश नाही बनू शकायचो. पण आज आमचे स्वप्न पूर्ण झाले. न्यायाधीश

बनायचे तर कायद्याचा किस पाडायचा. मोठाली पुस्तके वाचायची.. पण आम्हाला कशाला हवा हा सारा बडेजाव? आम्ही स्वत:च कायदा आहोत! आजपासून आम्ही न्यायासनावर न बसता न्यायदान करू शकू.. आमची स्वप्नपूर्ती झाली! आता थोडा वेळ त्यात द्यावा लागेल. पण त्याचे काही नाही. आम्ही दिवसाचे वीस तास देशसेवेत घालवतो. त्यात अजून एक दोन तासांची भर..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : कशासाठी होय प्रधांजी?

प्रधानजी : आपल्या चोवीस पैकी बावीस घटिका देश कामात व्यग्र राहण्याची कल्पना देशवासियांस देण्याबद्दल.. होय महाराज!

महाराज : आपण कुशाग्र बुद्धीचे आहात प्रधांजी!

प्रधानजी : थ्यँक्स महाराज!

महाराज : आज आम्ही खरेच शिणलो आहोत. ध्यानीमनी नि स्वप्नी.. एकच ध्यास. प्रगती नि विकास. त्यात येणाऱ्या न्याय अन्यायाच्या अडथळ्यांवर मात करत आम्ही पुढे जाऊ. आम्ही वेगाने धावू इच्छितो. आमच्याबरोबर चक्रमपुर राज्य ही तसेच प्रगत होईल. त्यामध्ये असे अडथळ्यांची शर्यत बनून मध्ये मध्ये येणारे न्यायमूर्तींसारखे लोक.. पण आम्ही म्हणालो तेच खरे.. एक ही बंदा काफी है. येऊ देत संकटे बाजूंनी

चारी. आमची आहे तय्यारी. पण तूर्तास.. येथेच थांबावे. दरबार बरखास्त!

प्रधानजी : होय महाराज!

दरबारी :

गुनहगारोंको नहीं माफी है
एक ही बंदा काफी है
एक दो तीन चार
चक्रम महाराज अतिहुशार!
कशात काय फाटकात पाय
चक्रमादित्यांचा न्यायान्याय!
सगळीकडे आबादी आबाद..
चक्रमादित्य झिंदाबाद!




# ८.

# विचार- अविचार!

# अर्थात

# कुलुपबंदी ते चावी बंदी!



महाराजांच्या सुटावर नि टायवर कुलुपांची नक्षी आहे. हातात चाव्या.. चेनमध्ये अडकवलेल्या. महाराज येता येता मोबाईलवरून काहीतरी संदेश पाठवतात. साऱ्या दरबाऱ्यांचा मोबाईल एकाच वेळी वाजतो. मोबाईलवर महाराजांनी पाठवलेला संदेश असतो तो एक बंद कुलुप नि चावी. त्याचा अर्थ कोणाला कळत नाही तरी सर्व खाली मान

घालून मोबाईलकडे पाहात बसतात. त्यामुळे महाराज सिंहासनावर बसले तरी घोषणा करायचे विसरतात. मग एकाएकी भानावर येत..

दरबारी :

राजाधिराज कुलुपसम्राट कुलुपादित्य महाराज की जय

एक कुलुप एक चावी

एक महाराज सबपर हावी!

कुलुप पहले चाबी बाद

चक्रमादित्य झिंदाबाद

बंदीसम्राट झिंदाबाद..!

महाराज : प्रधांजी, नवीन न्यायाधीशांच्या नेमणुकीची हालहवाल काय आहे?

प्रधानजी : युद्धस्तरावर प्रयत्न चालू आहेत महाराज. आम्ही योग्य उमेदवाराच्या शोधात आहोत. ज्यांचा भूतकाळ उज्वल असेल अशा उमेदवारांच्या वर्तमानात मुलाखती घेऊन त्यांना भविष्याबद्दल प्रश्न विचारले जात आहेत. विविध प्रश्नांवर त्यांची मते विचारली जात आहेत. कायद्याव्यतिरिक्त इतर सामान्य व व्यवहार ज्ञान, चक्रमपुरातील सद्य स्थिती तसेच इतिहास वगैरेंबद्दल चारीबाजूंनी त्यांची परीक्षा घेतली जात

आहे. सरते शेवटी त्यांच्या पाठीचा कणा किती वाकतो आहे हे पाहातो आहोत. या कसोटींतून तावून सुलाखून उत्तीर्ण होणाऱ्यांना एका अति निरुंद व अत्यंत कमी उंचीच्या बोगद्यातून सरपटत जावे लागते. अशी सत्वपरीक्षा देऊन तीन उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. त्यांची महाराजांनी जातीने परीक्षा घ्यावी..

महाराज : बस प्रधांजी! इतकी कठोर परीक्षा? कशासाठी?

प्रधानजी : आम्हास ठाऊक आहे महाराज की न्यायमूर्तींची नेमणूक ही नाममात्र. त्यासाठी फार मेहनत करण्याची गरज नाही. परंतु..

महाराज : परंतु काय प्रधांजी?

प्रधानजी : परंतु अत्यंत लवचिक कण्याचे व सरपटू शकणारे कोणी असतील तर महाराजांवरील कामाचा ताण कमी होईल व अन्य ठिकाणी लक्ष केंद्रित करता येईल.

महाराज : ठीक. आमचा असा समज झाला की न्यायाधीश भरती आपण फार गंभीरतेने घेतली की काय! असो. पण तुम्ही आमच्या तालमीत तयार झालेले आहात. आम्ही 'एक देश, एक राजा', 'एक राजा, एक कारभार' अशा सर्व 'एकी'करणाचे पुरस्कर्ते आहोत. आमच्या पिताश्रींच्या पिताश्रींनी सर्व जनतेस एकच गणवेश परिधान करावयास लावलेला. सर्व जन एकच जेवण एका दिवशी जेवत. असा एक जिनसी समाज घडवायचा होता त्यांना. त्यांचा वारसा लाभलेले आम्ही. आम्हाला 'एक

सिंहासन.. एक सत्ता', 'एक आदेश एक निर्देश..' असे सारे घडवून प्रगतीपथावर जायचे आहे.

प्रधानजी : आम्हाला व सर्व जनतेला कल्पना आहे याची महाराज. दररोज सकाळी महाराज देवळात आपली आरती होते. पंचारती ओवाळल्या जातात. काहींनी तर महाराज प्रसन्न व्हावेत म्हणून जांभळे गुरूवार करावयास सुरूवात केली आहे..

महाराज : जांभळे गुरूवार? हे नवीन काही?

प्रधानजी : महाराज! आपणास ठाऊक नाही असे कसे होईल? हे नवीनतम व्रत आपणास प्रसन्न करण्यासाठीच आहे. त्यादिवशी जांभळी वस्त्रे परिधान करून जांभळया पदार्थांचेच सेवन केले जाते. जांभळाच्या झाडांना त्यामुळे अनन्य साधारण महत्व आले आहे.. चक्रमपुर टाइम्समध्ये याबद्दल माहितीपर लेख आल्यानंतर हे व्रत करणाऱ्यांची संख्या वाढते आहे. रणसिंगरावांनी आपल्या जांभळाच्या झाडांवरील जांभळे जनतेस उपलब्ध करून दिली आहेत. आपली भावुक नि भाविक जनता ही रांगा लावून ती खरेदी करत आहेत महाराज. त्यानंतर राज्यभरातील आपल्या देवालयात जांभळी फुले वाहून त्यांना दुग्धाभिषेक होतो. रणसिंगराव येथेही आपल्या बागेतील गोकर्णाची फुले व डेअरीतील दूध भक्त जनांस उपलब्ध करून देत आहेत महाराज.

महाराज : रणसिंगरावांसारखे निष्ठावान सेवक आहेत म्हणून हे राज्य व्यवस्थित सुरू आहे.

प्रधानजी : होय महाराज! आणि हे व्रत करणाऱ्यांची संख्या वाढतच आहे महाराज.

महाराज : आम्ही प्रसन्न आहोत! अतिप्रसन्न आहोत! आम्ही दिवसेंदिवस विचार करत आहोत. नि आम्हाला जाणवते ते हेच, विचार करणे किंवा न करणे यामुळे पूर्ण जग बदलू शकते. सर्व क्रियांच्या मुळाशी असतो तो विचार. बंदुकीची गोळी स्वत: जाऊन शत्रूस मारत नाही. ती बंदूक चालवणारा कोणी असावा लागतो. त्याच्या डोक्यात तसा विचार यावा लागतो. आम्हाला कौतुक याचे आहे प्रधांजी.. आम्हास प्रसन्न करण्यासाठी कुठले व्रत आहे याचा पत्ता आम्हासच नसावा नि चक्रमपुर टाइम्सने याबाबत जनतेचे पद्धतशीर ब्रेन वाॅशिंग करून आपला जांभळाचा नि दुधाचा खप वाढवावा.. आमची जनता अशा गोष्टींवर डोळे झाकून विश्वास टाकते. नुसता विश्वासच नव्हे तर त्यासाठी पदरमोड करते. देवळांत रांगा लावते. आम्ही प्रसन्न आहोत. अशी विचार न करणारी.. निर्विचारी जनता असेल तर या साम्राज्यास नि या सिंहासनास अविचाराचा कोणताच धोका नाही.

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : विचार! विचार हाच माणसाचा शत्रू नि मित्र देखील. पण विचार करणारी, विचारी किंवा प्रश्न विचारणारी जनता हा राज्याचा नंबर वन शत्रू. बाह्य आक्रमण डोळयांस दिसते. हे आतून होणारे आक्रमण अदृश्य असते. आमचे पिताश्री, तसेच आजोबा ही म्हणत असत, जोवर माणसाच्या मेंदूत येणारे विचार राज्यकर्त्यांस ठाऊक होण्याचे कुठले तंत्रज्ञान येत नाही तोवर राजमुकुट काटेरीच असणार नि सिंहासनावर ही काटेकुटेच असणार. पण ह्या जांभळ्या व्रताने सिद्ध केले, आमची जनता आम्ही म्हणू तशी हाकली जात आहे. ती विचार करत नाही. आमच्या उपाययोजना कामी येत आहेत..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : रणसिंगराव हुशार निघाले खरे! काही महिन्यांपूर्वी आम्ही त्यांना हे सारे बोललो होतो. त्यावर विचार करून असे व्रत त्यांनी बनवावे! आम्ही प्रसन्न आहोत. अशी जनता असेल तर राजाचे काम किती सुरळीत होईल! आपली शिक्षण धोरणे काम करत आहेत. आमच्या द्रष्ट्या आजोबांपासूनच्या 'होय' म्हणण्याच्या प्रशिक्षण केंद्रांचा फायदा होत आहे. आज आम्ही प्रसन्न आहोत..

प्रधानजी : महाराज प्रसन्न तर सारी जनता प्रसन्न..

महाराज : प्रधांजी, आम्ही तुम्हाला तुमचे मत विचारतो.. राज्यात विचार बंदी लागू करावी का?

प्रधानजी : आपला तसा विचार नि हुकूम असेल तर करता यावी महाराज!

महाराज : शाबास! आपण ही स्वत: विचार न करता प्रश्न पुढे सरकवलात! पण आम्ही विविध गुरूंकडून शिकलो ते हे.. सर्वच गोष्टींवर बंदी घोषित केली जाऊ नये. काही गोष्टी न बोलता कराव्यात. अघोषित बंदी कधी कधी जास्त काम करून जाते. घोषित बंदी मध्ये जनता विचार करते.. बंदी का आली असावी? अघोषित बंदीत जनतेस अशी बंदी आहे हेच न समजल्याने त्यावर नाहक चर्वितचर्वण होत नाही. आमचे धोरण हे असावे की, जनतेस कशात तरी गुंतवून ठेवणे महत्वाचे. तेव्हा काही बिन महत्वाच्या प्रश्नांवर राज्यात चर्चा सुरू ठेवावी. लोकांचे विचार जाणून घ्यावेत. एकतर जनतेस ते विचार करणारे अभिजन असल्याचे समाधान! नि मुख्य म्हणजे लोकांना महत्वाच्या प्रश्नांवर विचार करण्याची उसंतच मिळणार नाही. विचार बंदी आमच्यासाठी कितीही रम्य कल्पना असली तरी ती अशक्य आहे याची आम्हाला कल्पना आहे. तेव्हा जोवर मनुष्याच्या डोक्यात येणारे विचार राजास डायरेक्ट समजतील अशी शास्त्रीय प्रगती होत नाही तोवर हेच वैचारिक धोरण अवलंबणे योग्य होईल.

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : अजून एक प्रश्न विचारतो प्रधांजी..

प्रधानजी : होय महाराज! चक्रमपुरात प्रश्न नि उत्तर दोन्ही आपणच आहात महाराज.

महाराज : प्रधांजी, आम्हाला सांगा.. कुलुप म्हणजे काय?

प्रधानजी : अर्थातच लॉक किंवा ताला.. टाळे वगैरे आपणास अभिप्रेत नसणार.. तेव्हा महाराजांनीच या कूट प्रश्नाचे उत्तर दिले तर..

महाराज : आम्ही काल रात्री विचार, मनन व चिंतनात गढून गेलो असताना आम्हाला हे ज्ञान प्राप्त झाले. कुलुप म्हणजे प्रश्न. विविध विषयांवर विविध जनांना नि मनांना पडणारे प्रश्न म्हणजे कुलुपे. आम्ही त्यावर बंदी घालू इच्छित आहोत. कुलुपाची चावी ही कुलुप उघडण्याची किल्ली असेल तर चावी हे प्रश्नावरील उत्तर आहे!

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आम्ही आधी कुलुपबंदी करण्याचा विचार करत होतो.

प्रधानजी : हुकूम महाराज.. सुधारित आदेशानुसार सुधारित कायदा तातडीने होईल महाराज.

महाराज : पूर्ण ऐकून घ्यावे प्रधांजी..

प्रधानजी : क्षमा महाराज..

महाराज : प्रधांजी, आम्ही पुढे विचार केला..

प्रधानजी : होय महाराज! आपला विचार अत्यंत योग्यच असणार महाराज. नव्हे योग्यच असतो महाराज!

महाराज : कुलुप म्हणजे प्रश्न असेल तर कुलुप म्हणजे बंदी देखील. एखादी गोष्ट बंद करण्यास कुलुप वापरले जाते. आम्हाला विविध गोष्टींवर बंदी आणणे हे राज्य सुरळीत चालवण्याचे मुख्य अस्त्र वाटते. तेव्हा आम्ही बंदीसम्राट कुलुप बंदी कशी आणणार? तेव्हा देशभरात कुलुपांवर बंदी आणण्याची कल्पना योग्य नाही, तर चावी बंदी योग्य!

प्रधानजी : जो हुकूम महाराज! 'चक्रमपुर चावी प्रतिबंधक (सुधारित) कायदा' तातडीने जारी होईल महाराज..

महाराज : थोडे थांबावे प्रधांजी.. आदेशात स्पष्ट लिहावे.. चक्रमपुरवासी कुलुपे वापरू शकतात पण बिन चाव्यांची. थोडक्यात किल्ल्यांवर बंदी आणावी..

प्रधानजी : हुकूम महाराज.. गडकोटांवर पण आणू महाराज?

महाराज : प्रधांजी.. ते किल्ले वेगळे.. या किल्ल्या.. जनसामान्य कुलुपे वापरू शकतात पण त्यांनी चाव्या वापरू नयेत.. आजपासून चाव्यांवर बंदी. पण बिन किल्लीची कुलुपे उघडावीत कशी?

प्रधानजी : याचे उत्तर ही महाराजांनाच ठाऊक!

महाराज : प्रधांजी, असे कुलुप उघडणारच नाही.. तेव्हा लोक कुलुप वापरणे बंद करतील.. त्यामुळे कुलुपबंदी न आणताच चावी बंदीने हे साध्य होईल..

प्रधानजी : आपण ग्रेट आहात महाराज. आपल्या विचारांस कोणतेच कुलुप बंद करू शकणार नाही! आजच आम्ही सुधारित आदेश काढतो.

महाराज : चावी बंदीच नव्हे तर कुणी कुणाकडे कुलुपाची चावी मागितली तरी गंभीर गुन्हा दाखल व्हावा. चावी मागणे म्हणजे कुलुप नामक प्रश्नाचे उत्तर मागणे. आम्हाला प्रश्नोत्तरांवर संपूर्ण बंदी आणावयाची आहे. प्रश्नोत्तरांत वेळ वाया न दवडावा. आम्ही दाखवतो त्या दिशेने प्रगती व विकासावर लक्ष केंद्रित करावे.. हा आमचा आदेश आहे!

प्रधानजी : होय महाराज! सुधारित सुधारित आदेश काढतो. पूर्वलक्षी प्रभावाने महाराज! आजवर महाराज विविध आदेश नि कायदेभंगामुळे देशातील दहा टक्के जनता कारागृहात आहे. आपल्या तुरुंग सुधारणेच्या सुधारित कायद्यानुसार प्रत्येकास अडीच हात जागा देण्यात येत आहे.

महाराज : अति योग्य! आमचे शासन गतिमान व प्रशासन प्रगतिमान! आम्ही प्रसन्न आहोत! प्रधांजी, दीर्घ विचारांती आम्ही असे ठरवले आहे की यापुढे काही कायदे असे बनवावेत की देशातील कोणीही, अगदी पापभीरू इसम ही कायदेभंग करताना आढळावा. कायदे बनवा. त्या कायद्यांची अंमलबजावणी करू नका. पण पुढे मागे हाच इसम आपल्या विरोधात गेला तर ह्याच कायदेभंगाचा लगाम आपल्या हाती रहावा! म्हणजे फॉर एक्झांपल, एखादा कायदा असा बनवा.. दिवसाला दोन लिटरहून जास्त पाणी पिणे 'जलपेयपान प्रतिबंध (सुधारित)

कायद्या'नुसार बेकायदा ठरेल.. किंवा रस्त्यावरून चालताना डावा हात उजव्या हाताबरोबरच हलला पाहिजे अन्यथा तो 'चक्रमपुर हस्त आंदोलन (सुधारित) कायद्या'चा भंग होईल.. वगैरे. आपल्या कायदेविभागात कल्पकतेची कमतरता नाही. तेव्हा असे विविध कायदे बनवायला घ्या. ते बनवून गुप्त ठेवा. त्यांची अंमलबजावणी फक्त काही कारणाने देशातील एखाद्या इसमास ताब्यात घ्यायचे असेल तर त्यासाठी होईल. हे कायदे अशा वेळी वापरात येतील. आणि कायद्याची माहिती नसणे हा बचाव होऊ शकत नाही! तेव्हा आपल्याला अडचणीत आणणारा कायद्याच्या वळचणीत स्वस्थ बसू शकणार नाही.

प्रधानजी : अति हुशार महाराज.

महाराज : प्रधांजी, आम्ही देशात लोकशाही आणण्याच्या दृष्टीने आम्ही पावले टाकत आहोत. त्याकरता सुधारणांचा वेग वाढवावा लागेल. थोडक्यात इतकेच की लोकशाहीत राज्य सुरळीत चालावे याकरता जास्त खबरदारी घ्यावी लागते!

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : तेव्हा हे कायदे बनवावयास घ्या. गरज पडल्यास जबरदस्त कल्पनाशक्ती असलेल्या कवी व लेखकांची मदत घ्या.

प्रधानजी : हुकूम महाराज!

महाराज : या सततच्या चिंतेने नि चिंतनाने आम्ही दमलो, शिणलो, थकलो आहोत. अर्थात आमच्या छायाचित्रात आम्ही कार्यबाहुल्याने व्यस्त आहोत असेच दिसू द्या. शेवटी राज्य करते ती व्यक्ती नव्हे तर तिची प्रतिमा. नि ह्या प्रतिमेच्या उभारणीसाठी लागते ती प्रतिभा!

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आमची दरख्वास्त.. दरबार बरखास्त!

प्रधानजी : हुकूम महाराज!

दरबारी :

चक्रमपुर सम्राट चक्रमादित्यांचा एक विक्रम
सुधार सुधारणा कायदे कानूचां एक क्रम
चक्रमपुराचा एकच राजा चक्रम चक्रम
चक्रमादित्य महाराज झिंदाबाद! झिंदाबाद!
बाकी सारे मुर्दाबाद! मुर्दाबाद!




# ९.

# लोकशाही..रं

# अर्थात

# चक्रमपुरात लोकशाहीचे आगमन



महाराज येताना परत हेलिकॉप्टरच्या डिझाइन मधील गाडीतून येतात. पंख्याकडे पाहात उतरतात.. मग हेलिकॉप्टर सह सेल्फी काढतात. उभे राहून तो सगळ्या दरबाऱ्यांच्या मोबाईलवर पाठवतात. सगळे आपापला मोबाईल पाहण्यात बिझी असताना महाराज सिंहासनावर येऊन बसतात. दरबारी घोषणा द्यायला विसरतात.. मग एकाएकी भानावर येत..

दरबारी :

महाराज चक्रमादित्यांचा विजय असो!

एक महाराज सारे आबाद!

चक्रमराजा झिंदाबाद!

एक महाराज एक सेल्फी

महाराज आईस्क्रीम और कुल्फी!

पहले दरबार बाकी सब बाद!

झिंदाबाद! झिंदाबाद!

महाराज : प्रधांजी.. हेलिकॉप्टर नीट पाहून ठेवा. हवेत झेपावणारे, पंख फडफड फिरणारे.. गगन भरारी घेणारे. आमच्यासारखे. आमच्या चक्रमपुरासारखे..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : ही आमची नवीन निशाणी आहे.. हेलिकॉप्टर!

प्रधानजी : निशाणी? म्हणजे आम्ही समजलो नाही महाराज.

महाराज : समजेल. लवकरच समजेल. आधी सांगा नवीन काही खबरबात? राज्यकारभारापासून काही तास दूर राहिलो की पाण्यावाचून माशासारखी गत होते आमची.

प्रधानजी : होय महाराज! आपल्यासारखे राजे मिळाले हे चक्रमपुरचे महद्भाग्य! लोक आता सगळीकडे कुलुपं लावत आहेत. आणि चावी बंदी असल्याने दगडाने ती तोडत आहेत. चावीबंदीचा असा परिणाम अपेक्षित नव्हता महाराज..

महाराज : आणि मग पुढे?

प्रधानजी : पुढे काय महाराज? राज्यभर कुलुपांची मागणी वाढली आहे महाराज. लोक कुलुप लावायचे थांबत नाहीत. बिन चाव्याच्या कुलुपांची मागणी वाढलीय. मग ती कुलुपं दगडानी तोडताहेत.

महाराज : यात कित्येक चांगल्या गोष्टी घडल्यात प्रधांजी.. सांगा कोणत्या?

प्रधानजी : आपल्यासारख्या असामान्याच्या नजरेत दिसणाऱ्या असामान्य गोष्टी आमच्यासारख्या सामान्यांच्या सामान्य आकलना पलिकडल्या असतात महाराज.. तेव्हा आपणच सांगून टाकाव्यात..

महाराज : एक.. चावी बंदीनंतर न निषेधाचा सूर उमटला न विरोधाचा. आमच्यावर विश्वास टाकून जनता आश्वस्त आहे. त्यांना या बंदीत गैर काहीच वाटत नाही ही बाब आपल्या प्रश्नबंदी धोरणाचे फळ आहे. डोळे झाकून आज्ञा पालन हा यशस्वी राज्यकारभाराचा पुरावा आहे!

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आता राहिला प्रश्न कुलुप फोडाफोडीचा.. त्याने आपले काहीच बिघडत नाही प्रधांजी. खरेखुरे प्रश्न न विचारणे इतकेच आपले चावीबंदी धोरणाचे उद्दिष्ट्य आहे. तेव्हा लोक कुलुपं लावण्यात, तोडण्यात नि परत नवीन आणण्यात मश्गुल असतील तर हा फायदा फारच मोठा आहे..

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : त्यामुळे त्यांच्या हातास काम मिळेल. सदैव नवनवीन कुलुपं मिळवण्यामागे जनता बिझी होईलच, नि बाकी कुठे लक्ष देण्यास तीस अवकाश मिळणार नाही!

प्रधानजी : एका बाणात इतके पक्षी?

महाराज : यालाच सक्षम राज्यकारभार म्हणतात!

कुलुपांच्या फोडाफोडीचा अंदाज आम्हाला होताच. पण हे इतकेच मर्यादित नाही प्रधांजी. आपल्या चावी बंदी धोरणाच्या काही सप्ताह आधी रणसिंगरावांनी देशातील तिन्ही कुलुप फॅक्टऱ्या पडेल त्या.. नव्हे पडेल किंमतीस विकत घेतल्या त्या काय उगाच? कुलुपांच्या फॅक्टरीतून रणसिंगरावांच्या उद्यमशीलतेस एका नवीन दालनाचे कुलुप उघडून मिळाले आहे असे समजा!

प्रधाजी : होय महाराज! आपण खरेच द्रष्टे व दूरदृष्टीचे आहात महाराज..

महाराज : आमचे पिताजी म्हणत, राजास तसेच असावे लागते! रणसिंगरावांसारख्या चक्रमपुरच्या आधारस्तंभास आम्ही काही थोडा आर्थिक आधार देणे आमचे राज्यकर्ता म्हणून कर्तव्य नव्हे का? बाकी राज्यरथ ओढणे म्हणजे सदा सतर्क राहत लोकांच्या इच्छा आकांक्षा आपणास हव्या तशा तयार करवणे.

प्रधानजी : आपण ग्रेट आहात महाराज!

महाराज : गेल्या कित्येक महिन्यांपासून केलेल्या चिंतन, मनन, अभ्यास यांतून घेतलेला बोध यावरून सर्व दरबाराचे आज आम्ही प्रबोधन करणार

आहोत. लोकांनी लोकांचे लोकांसाठी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही.. तर खास लोकांनी खास लोकांसाठी चालवलेले खास लोकांचे राज्य म्हणजे खास लोकशाही.. चक्रमपुरात आता खास लोकशाही आणण्याची वेळ आली आहे..

प्रधानजी : होय महाराज! तसा सुधारित आदेश काढतो महाराज!

महाराज : नव्हे प्रधांजी! लोकशाही अशी आदेश काढून प्रस्थापित होत नाही! तिच्यासाठी मेहनत करावी लागते!

प्रधानजी : क्षमा असावी महाराज.

महाराज : प्रधांजी, आमच्या प्रदीर्घ अभ्यासानंतर लोकशाही म्हणजे काय नि ती राबवावी कशी हे आम्ही दरबारास अवगत करून देणार आहोत. त्यासाठी आम्ही कित्येक लोकशाह्यांचा अभ्यास केला.

प्रधानजी : आपण ग्रेट आहात महाराज! आपल्या अभ्यासाच्या, जागरणाच्या, कार्यबाहुल्याच्या वगैरे कथा, दंतकथा बनून राज्यभर चर्चेत आहेत महाराज. चक्रमपुर टाइम्स यासाठी 'चक्रमादित्याच्या सत्य दंतकथा' हे साप्ताहिक सदर चालवत आहे महाराज! त्यासाठी आपली कथालेखक, साहित्यिक वगैरे मंडळी मजकूर पुरवण्याचे काम करत आहेत महाराज. तसे आदेशच आम्ही काढले आहेत महाराज.

महाराज : आम्ही प्रसन्न आहोत. पण आसन्नमरण झालो तरी आम्ही हे चक्रमपुरविकासाचे प्रसन्न कार्य सोडणार नाही..

प्रधानजी : होय महाराज! हे वाक्य चक्रमपुरच्या इतिहासात अजरामर होण्याची व्यवस्था करवतो महाराज आम्ही!

महाराज : आपण अतिहुशार आहात प्रधांजी.

प्रधानजी : थ्यँक्स महाराज.

महाराज : प्रधांजी, आज आपला दरबार खास आहे. खास लोकशाहीबद्दलच्या खास गोष्टी आमच्या खास दरबारास सांगाव्यात अशा खास उद्देशाने आम्ही आज हा दरबार भरवला आहे. सर्वांनी खास ध्यान देऊन हे लोकशाहीचे नानाविध पैलू समजून घेण्याची खास काळजी घ्यावी. आमच्या निर्णयानुसार लवकरच चक्रमपुर एक लोकशाही देश होऊ घातला आहे, तेव्हा होणारे व न होणारे ही बदल काय असतील याचे विश्लेषण आम्ही करणार आहोत. त्याआधी एक इंग्रजी वाक्य उद्धृत करून सुरुवात करतो.. 'मोअर द थिंग्स चेंज.. मोअर दे रिमेन द सेम!' हे आपले यापुढील ब्रीद असेल! म्हणजे गोष्टी जितक्या बदलतात तितक्या त्या तशाच राहतात. तेव्हा आपल्या राज्यातील राजेशाही जाऊन लोकशाहीचे आगमन व्हावे अशी आमची इच्छा आहे. आम्ही देशविदेशात फिरतो, जगभर आमचा वावर असतो. आम्हाला म्हणजे चक्रमपुरास मानसन्मान मिळतो, पण लोकशाही मिरवणाऱ्या देशप्रमुखांचा तोरा काही और असतो. आमच्या निरीक्षणानुसार त्यातील काही तर लोकशाही आडून चालणारी हुकुमशाही राज्ये आहेत. तरीही जनतेचे प्रतिनिधी म्हणून ते ताठ मानेने मिरवतात सारे. हुकुमशाहीचा, नव्हे या हुकुमशाही या शब्दाचा आमच्या पिताजींइतकाच आम्हासही तिटकारा आहे. त्यांनी तर हुकूम हा शब्दच राज्यातून हद्दपार करण्याचा हुकूम काढलेला एकेकाळी! हुकुमशाही म्हणजे हुकुमाची हुकूमत. हुकूम सोडा.. कामे करून घ्या. जनतेचे भलेबुरे राज्यकर्ता पाहून घेतो. पण

हुकुमशहांना जगभरात अगदीच वाईट नजरेने पाहिले जाते. आणि हुकुमशाहीतच फक्त हुकुमत गाजवता येते असे नाही. आमची इच्छा आहे आम्ही सम्राट बनावे, लोकशाहीचे सम्राट बनावे. अनभिषिक्त पासून अभिषिक्त सम्राट व्हावे. चक्रमपुर राज्याची रचना, कार्यपद्धती तशीच राहिल. राज्यशकट आम्हीच हाकू. परंतु या सर्वांस अधिक आकर्षक अशा आवरणातून पेश केले जावे. येणारा आदेश, हुकूम जन प्रतिनिधीच्या तोंडून आल्यासारखा असावा. आदेश तोच पण त्यास लोकशाहीचा मुलामा असावा. बर्फीवर चांदीचा वर्ख चढवतात तसा आमच्या हुकुमांवर लोकशाही शिक्क्याचा वर्ख चढावा!

प्रधानजी : आपण थोर विचारवंत आहात महाराज!

महाराज : यासाठी आपल्याला जय्यत तयारी करावी लागेल प्रधांजी.

प्रधानजी : आपण आदेश द्यावा. आम्ही तातडीने कार्यवाही करू महाराज.

महाराज : प्रधांजी, लोकशाही म्हणजे निवडणुका. लोकांनी दर काही वर्षात आपला प्रतिनिधी व राज्याचा प्रमुख निवडणे. जनतेस दरडोई एक मत असेल. बुद्धिमान असो ना बिनडोक.. दरडोई एक मत. लोकशाही म्हणजे बहुमताचे राज्य. लोकांनी मत दिले की आमच्याकडून त्यांना काय मिळेल?

प्रधानजी : आपण सांगावे महाराज..

महाराज : बोटावरची न पुसली जाणारी खास अनार्यावर्तातून मागवलेली शाई!

प्रधानजी : हे तर खास आहे एकदम! लोकशाई म्हणतात ती हीच? मग जो बहुमताने निवडला जाईल तो राजा बनेल?

महाराज : राजा नव्हे.. त्यास राष्ट्राध्यक्ष अथवा पंतप्रधांन म्हटले जाते. तसा तो एक प्रकारे राजाच असतो. पण दर काही वर्षांनी जनता त्यास निवडून देत असते. त्यासाठी चौ किंवा पंचवार्षिक निवडणूक होते. किमान दोन जण निवडणुकीसाठी उमेदवार असतात. अर्थात त्यातून आम्हीच निवडून येऊ.

प्रधानजी : पण याचा अर्थ महाराज दुसऱ्या कोणास राजा बनण्याची संधी मिळू शकेल?

महाराज : कागदोपत्री होय. जनतेने त्यास जास्त मते दिलीत तर. तसा आम्हास धोका नाही. आमच्याहून पुढे कोणी जाणार नाही. आमची जनताच कोणास पुढे जाऊ देणार नाही. आणि आम्ही अन्य देशांचा अभ्यास केला त्यात हे पाहिले आहे, अन्य कोणी पुढे जात असल्यास निवडणूक घडवणारी यंत्रणा तर आमच्याच हाती असेल. तेव्हा असे आक्रित होणे नाही. आमच्या अभ्यासानुसार लोकशाहीत म्हणे चार आधारस्तंभ असतात. आम्ही व मंत्रीमंडळ, आपले अधिकारी, न्याययंत्रणा व वृत्तपत्रवाले. यातील न्यायव्यवस्थेवर पहिल्यापासूनच वचक व कंट्रोल ठेवला तर इतरांस मॅनेज करणे कठीण नाही. न्याययंत्रणेचा धोका असा की तिच्यात सारेच उच्चशिक्षित व कायद्याचे ज्ञान असणारे. आणि ज्ञानामुळे घमेंड असणारे. आम्हाला ठाऊक आहे, शिक्षणानेच ही घमेंड येते. काही देशांत या न्यायालयाच्या आढ्यताखोरतेने राज्यकर्त्यांस समस्या होऊ घातल्याचा इतिहास आहे. आम्ही एक विसरलोच..

प्रधानजी : काय महाराज?

महाराज : अशी लोकशाही व्यवस्था ज्या सांगाड्यावर चालवावी त्यास संविधान किंवा राज्यघटना म्हणून आधी बनवावी लागेल. त्यातील नियमानुसार राज्य चालेल.

प्रधानजी : पण हे नियम तर आपणच बनवाल महाराज. तेव्हा..

महाराज : पण येथे सावध रहावेच लागेल. कित्येक देशातील राज्यकर्ते त्यांच्या प्रबळ संविधानाने अडचणीत आलेले आहेत. तेव्हा चक्रमपुरची राज्यघटना अति काळजीपूर्वक बनवावी लागेल. आमच्या ध्यानी आलेली बाब ही, राज्यघटनेत पुरेशी संदिग्धता असेल तरच राज्यकर्त्यास त्याचा फायदा घेता येतो. लोकशाहीत जनता सर्वोच्च हे कागदोपत्री लिहावेच लागते, परंतु राज्यकर्त्यांना आपली काळजी आपणच घ्यावी लागते. अन्य देशांकडून आम्ही शिकलो ते हे, की न्यायालयाहूनही देशप्रमुख सर्वोच्च मानला जाणे.. म्हणजे आपण मध्यंतरी न्यायदान व्यवस्थेत जी सुधारणा घडवून आणली, ती महत्वाची. बाकी नवीन घटनेत संदिग्धपणा असल्यास ठीक, पण याचा उल्लेख मात्र घटनेत नि:संदिग्ध व्हावयास हवा.

प्रधानजी : हुकूम महाराज!

महाराज : आम्ही येथील राजे. महाराज चक्रमादित्य! जगात तीन प्रकारच्या राज्यव्यवस्था असतात. एक आपली आहे तशी राजेशाही, दुसरी हुकुमशाही नि तिसरी लोकशाही. जगात लोकशाहीचा बोलबाला आहे. तिला नाव आहे, प्रतिष्ठा आहे. हुकुमशाहीचा धाक असेलही पण दुनिया त्यांच्याकडे फक्त भीतीने पाहते. आदराने नाही. आम्हाला हवी ती आदर्श पद्धत या तिघांचे मिश्रण असलेली. तिच्यात ग्लॅमर लोकशाहीचे

असेल, सुरक्षा म्हणजे, राजेशाहीत राज्यकर्त्यास असते तशी सिंहासनाची सुरक्षा असेल नि राज्य चालवण्यात विना अडथळा व बिनविरोध हुकूम सोडता यावेत असा हुकुमाचा अंमल ही असेल. खरेतर शेवटची दोन उद्दिष्ट्ये आम्ही आधीच साध्य केलेली आहेत. आम्ही रीतसर निवडून येऊन या राजगादीवर बसलो तर ही तिसरेही उद्दिष्ट साध्य करता येईल. त्यासाठी हा आमूलाग्र बदल करण्याचा घाट घालावा लागणार आहे.

प्रधानजी : होय महाराज! महाराजांनी चिंता करू नये. आम्ही सारे महाराजांचे विनम्र सेवक व सर्व चक्रमपुरातील महाराजांची सदैव ऋणी असणारी जनता महाराजांची इच्छा पूर्ण करण्यास बांधील आहोत. आपण फक्त आज्ञा द्यावी.

महाराज : आम्हास ठाऊक आहे ते म्हणूनच तर हा बाह्य बदल घडवण्याचे ठरते आहे. आपल्या जनतेस राजा, राजेशाही व त्याच्या तडकफडक निर्णय घेऊन आदेश जारी करण्याचे नि विनातक्रार हुकुमपालनाचे ही आकर्षण आहे. देश हा आदेशावर चालतो! गेल्या काही महिन्यांपासून आम्ही केलेल्या विविध उपाययोजनांमुळे आता लोकशाहीची प्रतिष्ठापना करणे तसे सुरक्षित आहे.

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : तरी देखील हा एक आमूलाग्र बदल आहे.. इतर निर्णय आम्ही एका झटक्यात घेतो. ते आदेश जारी केले की त्यात हव्या तशा नि हव्या तितक्या सुधारणा करतो. पण हा निर्णय तसा नाही. येथे पूर्ण विचारांची गरज आहे. लोकशाही ही दुधारी तलवार आहे. ती आम्हास ही नुकसान पोहोचवू शकते. कारण, आम्ही कितीही म्हणालो की राज्य

चालवण्याचा जनतेशी काय संबंध, तरीही लोकशाहीत लोकांचा म्हणजे जनतेचा संबंध येणारच. लोकच निवडणुकीत मतदान करतील. तेव्हा त्यांच्या हाती त्या दिवसापुरती तरी सत्ता जाणारच.. यावर आम्ही गेले कित्येक दिवस प्रदीर्घ चिंतन करत होतो..

प्रधानजी : होय महाराज! आपल्या कार्यबाहुल्यास तोड नाही ..

महाराज : ते एकदा बोलून झालेय प्रधांजी. पुढे ऐकावे..

प्रधानजी : क्षमा असावी महाराज.

महाराज : देशातील सामान्य जनता मुकी बिचारी कुणी ही हाका या श्रेणीतील असते. ती सामान्य असते म्हणूनच 'जनता' कॅटेगरीत राहते. जितकी जनता या श्रेणीत जास्त तितके राज्य सुखी. रोटी कपडा आणि मकान यांसाठी झगडताना जनतेला जगण्याचा एक उद्देश तर आपण पुरवतोच पण इतर बाबींवर लक्ष देण्यास त्यांना वेळ न मिळण्याची ही व्यवस्था आपोआप करत असतो. तेव्हा आम्ही दीड पोटी जनतेचे स्वप्न पाहात आहोत..

प्रधानजी : दीड पोटी?

महाराज : होय. आमच्या चिंतनातून आम्ही हा सिद्धांत बनवला आहे. चक्रमादित्याचा 'दीडपोटी सिद्धांत.'

प्रधानजी : तुस्सी ग्रेट हो महाराज!

महाराज : आधी ऐकून तर घ्यावा तो प्रधांजी.

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : जनता सदा पोटाच्या चिंतेत असणे राजास श्रेयस्कर. इथे राजा म्हणजे लोकशाहीतील राज्यप्रमुख. अगदीच अर्धपोटी असेल जनता तर अर्धमेली होते ती. अशी जनता एकदा पोटातील आग विझत नाही असे दिसले तर आक्रमक होऊ शकते. तेव्हा तिला एकवेळचे जेवण नीट मिळावयास हवेच. पण दुसऱ्या वेळचेही पोटभर मिळाले तर मात्र तिला फुरसतच फुरसत मिळेल इतर विचार करावयास. तेव्हा दोन वेळचे नव्हे, तर दीड वेळचे जेवण मिळाले की पूर्ण पोट भरण्याची लढाई जनतेस सुरू ठेवावीच लागेल. हीच आमची दीड पोटी जनतेची थियरी आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा मानल्या की शिक्षण,आरोग्य वगैरे बाबींस अनुल्लेखाने फाटा मारता येतो. तेव्हा राज्यकर्त्यांने या अन्न, वस्त्र, निवाऱ्याबद्दलच सतत बोलत राहिले पाहिजे. आता राहिले काही राज्यातील इतर 'असामान्य' लोक. साधारण दहा टक्के यात मोडतात. त्या असामान्यांस राज्यव्यवस्थेचाच एक भाग बनवून घेतले तर राज्य हाकणे सोयिस्कर होते. त्यासाठी थोड्याफार सवलती त्यांना दिल्या की पुरे. ती मंडळी स्वत:च्या आर्थिक विकासात मग्न असतात. तर सामान्य जन स्वत:च्या आर्थिक विवंचनेत. असा सर्व अतिसामान्य नि असामान्य वर्ग अर्थकारणात बिझी राहिला की इतर कशात त्यांना अर्थ वाटत नाही नि आपणास राज्य सुरळीत चालवता येते.

प्रधानजी : महाराजांचा अभ्यास सखोल झाला आहे. असे अभ्यासू, विचारी व सदा चक्रमपुर हितैषी महाराज लाभले म्हणून चक्रमपुरवासीयांनी देवाचे आभार मानायला हवेत.. नव्हे, ते मानत आहेतच. प्रत्यक्ष भगवंताचा

अवतार चक्रमपुरी राज्य करत आहे हे पाहून सामान्य जनता नतमस्तक होत आहे.

महाराज : परंतु हीच जनता लोकशाहीत राज्यकर्त्याचा विनाश करू शकते प्रधांजी. लोकशाहीचे फूल दिसायला रंगीबेरंगी नि आकर्षक आहे, पण ते फार सांभाळून हाताळावे लागते. कधी हे रंगीबेरंगी फूल बेरंग करेल सांगता यायचे नाही. ते न कोमेजावे म्हणून काळजी, गळयात हार म्हणूनच पडावे म्हणून ही काळजी. नाहीतर शवयात्रेत हीच फुले अंगावर पडायची!

प्रधानजी : असे अभद्र बोलू नये महाराजांनी.

महाराज : प्रधांजी, तुम्हाला अंदाज येणार नाही, परंतु कित्येक लोकशाही देशांत अशा रीतीने सत्तापालट होतो. एका राजाचा असा अंत म्हणजे राजकीय शवयात्राच ती! तरीही आम्ही सारासार विचार करून हे फूल हस्तगत करायचे मनावर घेतले आहेच. आमच्या कांचनदेशाच्या दौऱ्यावर तिकडचे अध्यक्ष दोराबचंद यांच्याशी भेट झाली. आमची चांगलीच दोस्ती आहे. गेली पंचवीस वर्षे ते सातत्याने निवडून येत आहेत. काही जणांचा विरोध असतो पण तरीही राज्याच्या घोड्यावरची मांड आणि कमांड थोडीही ढिली पडू दिली नाही त्यांनी. राष्ट्राध्यक्ष दोराबचंदांनी आम्हाला या संदर्भात चांगलेच ज्ञान दिले. किंबहुना त्यांच्या अनुभवांतूनच बोध घेऊनच आम्ही हा लोकशाहीचा डाव मांडायचे ठरवले आहे. थोडी काळजी घेतली तर समाधान देणारी लोकशाही सारखी दुसरी व्यवस्था राज्यकर्त्यासाठी नाही. जनतेस ही लोकशाहीत आपल्याच हातात सारे काही असल्याचा आभास देणारे समाधान

मिळतेच. पण दोराबचंदानी फक्त काही पथ्ये सांगितली आहेत. अखंड रहावे सावधान हे तर आहेच. तसे राजासही सदा सतर्क रहावेच लागते. तरीही निवडणुकांत दगाफटका न होण्यासाठी चोख व्यवस्था सदैव करत रहावी लागते. त्यासाठी जनमानसावर सतत विविध प्रयोग करावे लागतात. प्रत्यक्षात असो किंवा नसो, प्रगतीचा भास आणि आभास सतत घडवत रहावा लागतो. जनता सुखी व समाधानी असल्याचे जनतेसच सतत सांगत रहावे लागते. निवडणुकीच्या वेळी विकासाचे चार तुकडे फेकले नि भावी प्रगतीचे चार तुकडे दाखवले की जनता वश होतेच. त्यासाठी रस्ता, वीज व पाणी प्रश्नांचा वापर करून त्यांवर काम करत रहावे लागते. राज्यकर्त्यास यासाठी सतत विकास कामे करावी लागतात. एक रस्ता शंभर वर्षे टिकला तर नंतर पुढे काय? जनतेचे थोडेसे आपल्या भार्यांसारखे असते. किती ही द्या, ये दिल मांगे मोअर असतेच. तेव्हा दिसेल असाच विकास करा. थोडा थोडा नि पुरवून पुरवून करा. म्हणजे पाच वर्षांनंतर विकासाबरोबर प्रगतीची जोडी जमवता येईल! थोडक्यात विकास वेड्स प्रगती!

प्रधानजी : आज महाराज एकदम खुशीत दिसतात!

महाराज : लोकशाहीच्या गहन नि अथांग अभ्यासातून थोडा विरंगुळा म्हणून थोडा विनोद. तशी विनोदाची आम्हाला ॲलर्जी आहे. तरीही.. तर थोडक्यात काय, चतकोर विकास, चतकोर विकासाचा आभास अशा अर्ध्या विकासाचा तुकडा आशाळभूत जनतेपुढे टाकला की लोकशाही आपल्याला हवी तशी सुखनैव चालवता येते. पुढच्या निवडणुकीसाठी विकासाचा उरलेला अर्धा तुकडा वापरावा! असा दांडगा अनुभव

दोराबचंदांचा आहे. अजूनही काही व्यवधाने सांभाळावी लागतात म्हणाले ते.

प्रधानजी : आपण ग्रेट आहात. आपण करालच ते.

महाराज : खरंय. करावे तर लागेलच. तर निवडणूक म्हटली म्हणजे पाच वर्षातील एक दिवस जनतेच्या नावाचा. बाकी सर्व दिवस आपले. पण त्या एका दिवसासाठी जनतेस बाकी सर्व दिवस आंजारून गोंजारून खुशीत ठेवा तर कुठे दरडावून धमकावून धाकात ठेवा. कॅरट आणि स्टिक ॲप्रोच म्हणतात तसेच काहीसे हे. बाकी व्यक्ती, अभिव्यक्ती असल्या स्वातंत्र्यांचे जास्त चोचले पुरवायची गरज नाहीच. तशी जनता पण शहाणी असते. विकासाच्या खऱ्या किंवा आभासी भाकरतुकड्यावर असे स्वातंत्र्याचे लोणी तिला लागत नाही. तिचे मागणे लई नसतेच. कुणीतरी तिच्यासाठी काहीतरी करतोय हे दाखवणारा राज्यकर्ता असला की पुरे! दोराबचंदांच्या कांचनदेशी म्हणे फारच आणीबाणीची परिस्थिती उद्भवलेली. त्यांच्या विरोधात जो कोणी होता त्याने सारा देश हलवला. ढवळून काढला..

प्रधानजी : पण महाराज, दोराबचंद तर मोठ्या फरकाने निवडून आलेले..

महाराज : खरेय ते. पण ते असे सुखासुखी झाले नाही. साम, दाम, दंड, भेद या चारी नीतींचा नीती की अनीती असा अविचार न करता त्यांनी वापर केला. विरोधकांची बदनामी हे अस्त्र अतिशय उपयोगी. कांचनदेश म्हणजे दोराबचंद नि दोराबचंद म्हणजे कांचनदेश.. हे जनतेच्या मनावर बिंबवले की विरोधकांस देशद्रोही बनवण्यास नि ते जनतेस पटवून देण्यास कितीसा वेळ लागणार? त्यांच्या देशात ही सरकारास प्रश्न

विचारणे हेच देशद्रोहाचे लक्षण हे जनतेस पटू लागले. तेव्हा विरोधी आवाज क्षीण न पडता तरच नवल. बाकी त्या विरोधकांची खरीखोटी प्रकरणे चव्हाट्यावर आणून पुरेशी बदनामी केली की साऱ्यांचा सुपडासाफ! हा दोराबचंदांचा शब्द!

प्रधानजी : महाराजांशी दोराबचंदांनी अति डिटेल्समध्ये बातचीत केलेली दिसतेय..

महाराज : अर्थात प्रधानजी. त्यांचा नि आमचा स्नेह आधीपासूनचा. परदेशातील आमच्या शिक्षणापासूनचा. ते तिकडील राज्यप्रमुखांचे एकुलते एक वारस.. इकडे आम्ही. आमची राजकीय कारकीर्द समांतर नि समकालीन. तेव्हा अशी मैत्री असेल तर ते आतील सारे सांगतात यात आश्चर्य नाही. दोराबचंदांनी अजूनही कित्येक गोष्टी सांगितल्या. त्या सर्वांमागे 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए' हे किंवा 'फोडा नि झोडा' हे तत्व वापरावे असे म्हणाले ते. अर्थात त्यांनी त्यास तात्विक मुलामा दिला तरी आम्हाला ही तत्वे अवगत आहेतच.

प्रधानजी : आपणास अवगत नाही अशी कोणतीच गोष्ट या जगात नाही महाराज..

महाराज : जनता ही देशाची संपत्ती हे जाहीर केले नि त्यावर जनोद्धार हेच आपले जीवनध्येय असे म्हटले की निम्मी जनता आपल्या कह्यात येते. निवडणुकीत जिंकण्यासाठी पन्नास टक्के जनता पुरेशी आहे! त्यासाठी मात्र कधी अधिक कष्ट करावे लागतात. जनतेस त्यांच्या बिकट स्थितीची जाणीव करून द्यावी लागते. नसलेले प्रश्न उपस्थित करून ते सोडवावे लागतात. जनतेची जाती, प्रजाती, भाषा, बोली, लिपी, प्रदेश, प्रांत, गाव,

गल्ली, रस्ता अशी विभागणी होऊ शकते नि प्रत्येक गटाच्या अशा अस्मिता असू शकतात. जिथे असे गट नि विभागणी नसेल तिथे ती निर्माण करून त्यांचे महत्व पटवून द्यावे लागते. म्हणजे विविधांगाने अशा अस्मितांना टोकदार बनवावे. इतके तीक्ष्ण की एका गटाची अस्मिता दुसऱ्यास नि दुसऱ्याची तिसऱ्यास टोचावयासच हवी. टोचली की वेदना व्हायलाच हव्यात. कधी कधी रक्तबंबाळही व्हायला हवे. मग आपसात त्यांची भांडणे म्हणजे कोंबड्यांच्या नाहीतर बैलांच्या झुंजी. आपण त्या पाहात पाहात आपला कार्यभाग साधावा. अशी जनतेची मानसिकता ज्याला मॅनेज करता येईल तो जनमानसावर राज्य करेल! कुणी म्हटले आहे तसे, कुंभार बना, गाढवांना तोटा नाही! तेव्हा राज्यकर्त्यास लोकशाहीत सर्वात कुशल कुंभारासारखे काम करावे लागते. जनता नामक मातीच्या गोळयास हवा तसा आकार देणे किंवा खरे तर जनता नामक गाढवाकडून हवे ते करवून घेणे हेच राज्यकर्त्याचे काम. अशा अस्मितांबरोबर वेगवेगळे सुटणारे, न सुटणारे पण खरेतर बिन महत्वाचे असे प्रश्न निर्माण करणे, जनतेस त्या प्रश्नांनाच जीवनमरणाचे प्रश्न वाटावेत अशी मांडणी सातत्याने करत खऱ्या प्रश्नांकडे डोळेझाक करावयास लावणे इत्यादी अनेक युक्त्या.. खरेतर क्लृप्त्या शिकाव्या लागतात. मंत्रीगण व अधिकारी आमच्या सांगण्याबाहेर नाहीत. वेगवेगळ्या यंत्रणांवर आम्ही आपलीच एकनिष्ठ माणसे बसवलीत की त्या यंत्रणा आपल्याच बटीक बनून राहतील. न्यायान्यायाची सोय केली की राज्यकर्त्यास सर्व रान मोकळे मिळू शकतेच. राहता राहिली वृत्तपत्रादि माध्यमे. कुठल्याही व्यवसायिक वा धंदेवाईकांस मॅनेज करणे हे अति सोपे. पैसा अशा ठिकाणी नव्हे तर कुठे कामी येणार?

जनतेकडूनच देशोद्धारासाठी कर वसुली करून देशाच्या तिजोरीतूनच हे सर्व मॅनेज करणे तसे सुलभ आहे. फक्त अशा करवसुलीस देशोद्धार सूचक नामकरण करता येणे महत्वाचे.

प्रधानजी : आमची तर मती गुंग होते महाराज. आपण तर प्रत्यक्ष देवावतार. आपणास असाध्य असे काहीच नाही. इतकी सारी व्यवधाने सांभाळणे कठीण..

महाराज : सत्य आहे. राज्य चालवणे, राज्य करणे व आपला एकछत्री अंमल राहिल अशी तजवीज करणे.. मुश्किल, पण असंभव नव्हे. एकदा सिंहासन, त्यातून येणारी सत्ता, आपणच राज्याचे एकमेव उद्धारकर्ता, विरोध करणारे ते देशविघातक वगैरे गोष्टी राज्यकर्त्यांच्या मनात बिंबल्या की मार्ग आपोआप सापडतच जातो. इच्छा तिथे मार्ग! दोराबचंदांनी मार्ग दाखवला आहेच. आम्ही हे सारे आत्मसात करत आहोतच. आमचा जगातील एका मोठ्या लोकशाहीचे मोठे प्रमुख म्हणून मान सन्मानाने व प्रतिष्ठेने मिरवण्याचा समय जवळ येत आहे.

प्रधानजी : होय महाराज!

महाराज : आणि एक बाब, दोराबचंदांच्या शब्दांस जागतिक पातळीवर वजन आहे. तेव्हा एकदा इथे लोकशाहीची स्थापना झाली की जगातील राजेशाही सोडून लोकशाही मूल्यांचा स्वीकार करणारा एकमेव देश म्हणून आमचे जागतिक पातळीवर स्वागत होईल.

प्रधानजी : होय महाराज. महाराजांचा विजय असो. तो लोकशाहीचा मंगल सुदिन लवकरच उजाडेल. महाराज सर्व जगास आदर्श घालून देणारे देशप्रमुख बनतील.

महाराज : खरे आहे सर्व. पण एक गोष्ट ध्यानात ठेवावी, सांगाडा बदलला तरी आत्मा तोच राहतो! त्यामुळे आम्ही म्हणालो तसे, फार काही बदलेल.. पण तसे काहीच बदलणार नाही. लोकशाहीच्या सुंदर आकर्षक वेष्टनात चक्रमपुरात आपले राज्य पहिल्याप्रमाणेच राहिल .. म्हणजे प्रगतीपथावर जात राहिल.

प्रधानजी : अर्थातच महाराज! आपण असताना अन्य काही असंभव आहे महाराज. इतक्या प्रदीर्घ चिंतनाने महाराज थकले असतील. आपण विश्राम करावा..

महाराज : आता विश्राम थेट लोकशाहीची प्रतिष्ठापना केल्यानंतरच.. लवकरच आम्ही निवडणुकांची घोषणा करू. त्यासाठी आमच्या विरोधात कोणास तरी निवडणूक लढवावी लागेल. तो योग्य उमेदवार आम्ही शोधूच. नियमानुसार एकेकास एक चिन्ह निवडणूक निशाणी म्हणून मिळेल. आम्ही म्हणालो ते हेलिकॉप्टर म्हणजे आमची निशाणी. आमच्या विरोधी जो असेल त्याची निशाणी असेल बैलगाडी! बैलगाडी हेलीकॉप्टरसमोर कधीच जिंकणार नाही! त्यावर जनता शिक्का उमटवून आमच्यावर राष्ट्राध्यक्ष म्हणून शिक्कामोर्तब करेल.

प्रधानजी : अर्थातच महाराज!

महाराज : आता सगळ्यांना कामास लागावे लागेल. राज्यघटना, कायदे कानून नि निवडणूक यंत्रणा.. मग प्रत्यक्ष निवडणूक..

प्रधानजी : आता या पुढील दरबार आता त्यानंतरच महाराज?

महाराज : चुकताय प्रधांजी. लोकशाहीत दरबारास दरबार म्हणत नाहीत. अधिवेशन म्हणतात. तेथील कामकाजाची पद्धत थोडी वेगळी असेल. यथावकाश ती सगळ्यांना माहिती होईलच.. तोवर या चक्रमपुरच्या चक्रमादित्याचा शेवटचा दरबार बरखास्त..

प्रधानजी : जो हुकूम महाराज!

दरबारी : महाराज चक्रमादित्यांचा विजय असो..

चक्रमपुर झिंदाबाद!

किंग चक्रमादित्या झिंदाबाद!

सर्व जगात एकच नाव..

सर्व जगात एकालाच भाव..

राजा चक्रमादित्य.. चक्रमादित्य!


लाँग लिव्ह किंग चक्रम


महाराज चक्रमादित्यांचा त्रिवार विजय असो!





डॉ. नितीन मोरे यांची ४६+२ प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.




























डॉ. नितीन मोरे
मुघले ते शोले
Version 2.0.2.0





HOSTEL-I


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा



डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा ३


डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे






डॉ. नितीन मोरे
सदू
आणि
दादू


डॉ. नितीन मोरे
ग.बा.च्या(प्रेम)कविता







डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच



आधुनिक कहाण्या





डॉ. नितीन मोरे





डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे


सांगतो ऐका



डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे





डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते



अंजनईय
डॉ. नितीन मोर
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तज्ञ : अंजना लगस



डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची 'परी'कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे




सुलट
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!
(अर्थात कविता २ डझन)

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष

# डॉ. नितीन मोरे यांचे हे एकोणपन्नासावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभिरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१६), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(१०), डॉ. नितीन मोरे (४९), अनील वाकणकर (९),

फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (१०), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(४६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (३), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(७) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१०), श्याम कुलकर्णी(१३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), ), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(२), बंकटलाल जाजू (५), जयश्री पटवर्धन(६) अरविंद बुधकर (२) प्रवीण दवणे, आर्या जोशी, सरोज सहस्रबुद्धे (१०), सविता शेट्टी (३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं "ई"यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

esahity@gmail.com

www.esahity.com

9869674820 (for free books on whatsapp)